SHIV VANI
# शिव वाणी
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521
L/130/RNP/Renewal/2025-2026
का.संपादक : वेदांत वैभव स्वामी
संपादक : वैभव विवेक स्वामी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक १४ | सोमवार दि.०६ एप्रिल २०२६ | RNI- MAHMAR2003/14666 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -14 | MONDAY DT.06 APRIL 2026 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 03 RUPEES

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# बीड जिल्हा परिषदेत पदोन्नतीचा 'महाघोटाळा' - राम खाडे

बीड प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग सध्या भ्रष्टाचाराचे कुरण बनले असून, कनिष्ठ विस्तार अधिकारी, वरिष्ठ विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेत करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी विभागीय आयुक्त यांच्याकडे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शिक्षण विभागातील पदोन्नती प्रक्रियेत सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध न करता, हरकती न घेता आणि कोणत्याही प्रकारची सुनावणी न करता नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती देण्यात आल्या आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, आणि सहाय्यक कार्यालयीन अधीक्षक यांनी संगनमताने आर्थिक व्यवहार करून ही प्रक्रिया राबवल्याचा थेट आरोप करण्यात आला आहे. ११ जागा असताना २५ उमेदवारांची प्रतीक्षा यादी तयार करणे, हा प्रकार पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे खाडे यांनी म्हटले आहे.

वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदासाठी मागील ५ वर्षांच्या ज्येष्ठता यादीचा कोणताही विचार न करता ८ जणांना पदोन्नती देण्यात आली. याबाबत तक्रारी होऊनही त्या तक्रारी दडपल्याचा आरोप केला आहे. तक्रारदाराचा संबंध नसल्याचे सांगून अनेक गंभीर तक्रारी निकाली काढण्यात आल्या, जे प्रशासकीय नियमांच्या विरोधात आहे.

प्रमुख मागण्या?

केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी.

या प्रकरणात दोषी असणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी. पदोन्नतीच्या सर्व संचिका (फाईल्स) ताब्यात घेऊन चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे. न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा.

## अधिकारी- कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाईची मागणी

### केंद्रप्रमुख पदोन्नतीत ४ ते ५ कोटींची 'माया' ?

सध्या सुरू असलेल्या केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेत तर भ्रष्टाचाराचा कळस झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. न्यायालयाचे निर्बंध असतानाही ७० ते ९० पदे भरण्याची तयारी सुरू असून, यामध्ये आर्थिक लागेबांधे असल्याचा दावा राम खाडे यांनी केला आहे. पात्र नसलेल्या उमेदवारांनाही पदोन्नती देण्याचा घाट या विभागाने घातला आहे.

### अल्पवयीन शिक्षक आता होणार केंद्रप्रमुख..!

धारूर तालुक्यातील एका विशिष्ट प्रकरणाचा उल्लेख करत खाडे यांनी प्रशासनाचे वाभाडे काढले आहेत. १८ वर्षे वय पूर्ण होण्याआधीच वस्तीशाळा शिक्षक म्हणून नियुक्त झालेला एक उमेदवार आता केंद्रप्रमुख होण्याच्या मार्गावर आहे. नियमांची ही पायमल्ली कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

# ना दहावा, ना तेरवा, तुकाराम मुंढेंनी आईच्या अस्थी विसर्जन करुन सांगितला विज्ञान विचार

मुंबई/बीड : आपल्या तत्ववादी आणि कायदेशीर, संवैधानिक मार्गाने कर्तव्य बजावणारे धडाडीचे आणि डॅशिंग अधिकारी म्हणून महाराष्ट्राला परिचित असलेल्या तुकाराम मुंढे यांनी नुकतेच राज्याच्या आपत्ती व निवारण विभागाच्या सचिवपदी बदली करण्यात आली. दिव्यांग कल्याण विभागातही त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवून दिली होती. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी त्यांच्या मातोश्रींचे निधन झाल्याने ते आपला प.बंगालचा दौरा सोडून बीड जिल्ह्यातील ताडसोना या मूळगावी पोहोचले होते. याच गावी त्यांच्या आईच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर, पुढील पारंपरिक विधी न करता तुकाराम मुंढेंनी विज्ञान आणि विवेकवादी विचार जपत आदर्श निर्माण केलाय.



आपल्या आईच्या अंत्यसंस्कारानंतर तुकाराम मुंढेंनी तिसऱ्याच दिवशी सर्व विधी पूर्ण केले, तसेच अस्थींचे विसर्जन नदीत न करता, आपल्यातच शेतात खड्डा खोदून, तिथे वडाचे झाड लावून पूर्ण केले. त्यांच्या या पुरोगामी विचारांचं सोशल मीडियातून कौतुक होत आहे. आता, तुकाराम मुंढे यांनीच याबाबत सोशल मीडियात पोस्ट करुन माहिती दिली.


''आमच्या बाईंच्या (आईच्या) स्मृतीप्रत्यर्थ आम्ही एक वेगळी आणि विचारपूर्वक वाट निवडण्याचा, संवेदनशील व विवेकवादी निर्णय मुंढे परिवारातर्फे घेतला आहे. निसर्ग हाच या सृष्टीचा निर्माता आणि सर्वश्रेष्ठ शक्ती आहे. त्याचे रक्षण, संवर्धन आणि सन्मान करणे हीच खरी भक्ती आणि खऱ्या अर्थाने श्रद्धांजली आहे. या विचारातून प्रेरित होऊन आम्ही आईच्या अस्थींचे पारंपरिक पद्धतीने नदीत विसर्जन न करता, त्या शेतात वृक्षारोपणासह विसर्जित केल्या आहेत, असे तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे. आम्ही त्या ठिकाणी वडाचे झाड लावले आहे, जेणेकरून आमच्या बाईंची माया सावलीच्या रूपाने पिढ्यानपिढ्या जिवंत राहील. हा वटवृक्ष आमच्या बाईंच्या मायेची सावली आणि जीजींचे आशीर्वाद बनून पिढ्यानपिढ्या बहरत राहील, अशी भावनिक आणि रुढी परंपरेला फाटा देत आपण पुढे जात असल्याची माहिती तुकाराम मुंढे यांनी आज व्यक्त केलीय.

आम्ही कोणत्याही प्रकारचा दहावा किंवा तेरवा न करण्याचा निर्णय घेतला आहे. विवेकवाद आणि विज्ञानाची कास धरून, सामाजिक उपयुक्ततेला आम्ही प्राधान्य दिले आहे. आजच्या आधुनिक युगात विज्ञानाची कास धरणे गरजेचे आहे. त्यामुळे सामाजिक उपयुक्तता आणि पर्यावरणाचे रक्षण करणे, हेच आमच्या आईच्या संस्कारांना साजेसे ठरेल, असे तुकाराम मुंढेंनी म्हटलं. तसेच, आमच्या या निर्णयाचा आपण आदर कराल आणि बाईंच्या आठवणी आपल्या हृदयात कायम जपून ठेवाल, हीच नम्र अपेक्षाही त्यांनी व्यक्त केलीय. दरम्यान, आम्ही सर्व भाऊ आमच्या आईला बाई म्हणून संबोधित असू, तर गावकरी आणि आप्तेष्टांसाठी त्या जीजी होत्या, असेही मुंढेंनी सांगितलं.

# भोंदू अशोक खरातचं बीड कनेक्शन, गर्भलिंगनिदान अन् रुपाली चाकणकरांचं नावं

पत्रानंतर महिला नेत्याचा गंभीर आरोप

बीड : भोंदू अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे यांना बीडमधून निनावी पत्र पाठवण्यात आलं आहे. या पत्रात राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या एका महिला पदाधिकाऱ्याचे नाव आल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. रुपाली चाकणकर यांच्या आशीर्वादाने बीडमधील महिला पदाधिकारी अशोक खरातकडे येथील महिला नेत होत्या, असा खळबळजनक दावा या पत्रात करण्यात आलाय. त्यामुळे, पुन्हा एकदा अशोक खरात प्रकरणावरुन रुपाली चाकणकर यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे गर्भलिंग निदान याबाबत चाकणकरांकडून अशोक खरात पाठराखण केली जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या हेमा पिंपळे यांनी केला आहे. पिंपळे यांनी संबंधित पत्राचा दाखलाही दिला.



बीडमधील डॉक्टरांकडून लिंगनिदान केलं जात होतं. या पत्रानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या हेमा पिंपळे यांनी पत्राची सत्यता तपासून पोलीस अधीक्षकांनी सुमोटो दाखल करून एसआयटीकडे हे पत्र द्यावे, याची चौकशी करावी अशी मागणी केली. तर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा लिंगनिदान होण्यासाठी पाठबळ देत होत्या, ही गंभीर बाब असल्याचा आरोप देखील पिंपळे यांनी केला. संबंधित पत्रावरील सहीची तपासणी केली तर त्या व्यक्तीपर्यंत पोहोचता येईल म्हणून त्याची सत्यता तपासण्याची मागणी केली जात आहे. अशोक खरातकडे बीडमधील महिला जात होत्या अशी चर्चा आतापर्यंत बीडमध्ये होती. परंतु, या पत्रातून त्याला उजाळा मिळाला असल्याचं पिंपळे यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, अशोक खरातप्रकरणी अद्यापही एसआयटीकडून आरोपीचा कसून तपास केला जात आहे. या तपासातून दररोज नवनवे कारनामे समोर येत आहेत. दुसरीकडे रुपाली चाकणकर यांनाही एसआयटीने समन्स पाठवून चौकशीसाठी बोलावले होते. तत्पूर्वी त्यांचा महिला आयोग अध्यक्षपदाचा राजीनामा घेण्यात आला असून राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरुनही त्या पायउतार झाल्या आहे. त्यामुळे, त्यांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नांदेडात २४ तासांत चौथा खून

नांदेड : प्रतिनिधी


शहरात शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या भीषण गँगवॉरमध्ये तिघांचा खून झाला. या घटनेचा तपास सुरू असतांनाच अवघ्या २४ तासांत म्हणजेच शनिवारी रात्री चौथ्या खुनाची घटना घडली. जुना मोंढालगतच्या मुरमुरा गल्लीत ही घटना घडली असून या प्रकरणी २ आरोपींना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान एका पाठोपाठ होणाऱ्या खुनाच्या घटनांमुळे शहरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे.



निळा रोडवरील कॅनॉल परिसरातील ई-स्केअर परिसरात शुक्रवारी रात्री झालेल्या गँगवारमध्ये तिन जणांची हत्या करण्यात आली. या रक्तरंजित खेळाने नांदेड जिल्हा हादरून गेला आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने पोलिस यंत्रणेसह जिल्हा प्रशासनाचा ताण यामुळे वाढले आहे. या प्रकणाचा तपास आणि आरोपींचा शोध सुरू असतांनाच खुनाची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. अवघ्या २४ तासात म्हणजेच शनिवारी रात्री चौथ्या खुनाची धक्कादायक घटना घडली आहे.

# ऊसतोड महिलांच्या अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया रोखण्यासाठी आ.नमिता मुंदडांचा पुढाकार

## पुणे येथील राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत केल्या महत्वपूर्ण शिफारशी



केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलमताई गोरे यांच्या अध्यक्षतेखाली गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांविषयी पुनर्गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची पहिली महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथे ४ एप्रिल २०२६ रोजी पार पडली.या बैठकीत केजविधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी उपस्थित राहून ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. राज्यातील ऊसतोड महिलांच्या अनावश्यक शस्त्रक्रियांवर नियंत्रण मिळवणे आणि त्यांना सुरक्षित आरोग्य सेवा पुरवण्यासाठी शासनाने तातडीने ठोस धोरण राबवावे,अशी आग्रही भूमिका मुंदडा यांनी यावेळी मांडली.बैठकी दरम्यान ऊसतोड महिलांच्या आरोग्याचे संरक्षण,अनावश्यक शस्त्रक्रियांवर कडक नियंत्रण आणि ग्रामीण भागातील महिलांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. आमदार नमिता मुंदडा यांनी यावेळी स्पष्ट केले की,महिलांचे आरोग्य ही केवळ त्यांची वैयक्तिक जबाबदारी नसून ती संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित आहे.प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि आरोग्यदायी जीवन मिळणे हा त्यांचा हक्क असून,त्यासाठी शासनाने सकारात्मक पावले उचलणे काळाची गरज आहे.या विषयावर प्रभावी धोरण तयार करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण शिफारशीही समितीमार्फत शासनाला सादर करण्यात आल्या आहेत.या विशेष बैठकीसाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ज्ञ,बीड जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.विशेषतः बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिलांच्या शस्त्रक्रियांच्या प्रश्नावर यापूर्वीही मोठे वादंग निर्माण झाले होते,त्या पार्श्वभूमीवर यासमितीची बैठक आणि मुंदडा यांनी मांडलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# खो-खो राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाला सुवर्ण व कांस्यपदक

## रवी दरगोंडा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू तर संभाजी मदन यांची सर्वोत्कृष्ट संरक्षक म्हणून निवड

बीड प्रतिनिधी

ओडिसा राज्यात आतागड कटक या ठिकाणी संपन्न झालेल्या खोखो इंडिया आयोजित अधिकृत राष्ट्रीय कुमार कुमारी १८ वर्षाखाली स्पर्धेत स्पर्धेच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या कुमार संघाने कर्नाटक संघावर रोमांचक विजय मिळवत अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा प्रेक्षणीय ठरला. अंतिम सामनात महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने कर्नाटक संघावर अटीतटीने मात करत सुवर्ण पदक मिळवले.

या सामन्यात दोन्ही संघांनी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. पहिल्या डावात महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही संघांनी ८-८ गुणांची बरोबरी साधली दुसऱ्या गावात दोन्ही संघाने जोरदार खेळकर १०-१० गुण मिळवले. त्यामुळे सामना बरोबरीत संपला आणि निकालासाठी अतिरिक्त डाव खेळवण्यात आला. अतिरिक्त डावात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी जबरदस्त आक्रमण करत १० गुणांची कमाई केली. कर्नाटक संघाला फक्त ९ गुणांची कमाई करता आली परिणामी महाराष्ट्राने अवघ्या एक गुणाच्या फरकाने हा थरारक सामना जिंकत अजिंक्यपद आपल्या नावावर कोरले. अंतिम सामन्यात रवी दरगोंडा आदेश मदन ओम दिवशे संभाजी मदन रोहित चारवंडे कार्तिक पवार रोहन महाजन आणि शिवदत्त दाभाडे यांनी संरक्षण व आक्रमण या दोन्ही विभागात अतिशय दमदार कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाला प्रशिक्षक



विभीषण पाटील (धाराशिव) यांचे मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून योगेश मोरे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. तसेच महाराष्ट्राचे समन्वयक सुरेश गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेत मुलांच्या गटात सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून रवी दरगोंडा यांचा गौरव करण्यात आला तर सर्वोत्कृष्ट संरक्षक म्हणून संभाजी मदन याला सन्मानित करण्यात आले. दरम्यान महाराष्ट्राच्या मुलींच्या संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत यजमान ओडिसा संघाचा पराभव करून कास्यपदक मिळवले मुलींच्या संघाकडून वैभवी मदन संतोषी शिंदे वैभवी मते या खेळाडूंनी प्रभावी खेळ करत संघाला विजय मिळवून दिला संघाला प्रशिक्षक म्हणून सचिन मोहिते (जालना)तर व्यवस्थापक म्हणून श्रीमती घनघन यांनी काम पाहिले. या दोन्ही संघांच्या यशामुळे सर्व खेळाडू प्रशिक्षक मार्गदर्शक व व्यवस्थापक यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे महाराष्ट्राच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कामगिरी करत अखेर विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. महाराष्ट्राच्या कुमार मुली संघांनी राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक व कांस्यपदकांची कमाई करत महाराष्ट्राची क्रीडा क्षेत्रात नावलौकिकत भर घातली आहे. महाराष्ट्र संघाच्या या पदक विजयी कामगिरिबद्दल शाहेद पटेल, प्रा डॉ तानाजी आगळे, सुरेश साळुंके प्रा. चित्राताई घोरपडे(आगळे), राष्ट्रीय खेळाडू तानाजी मेटे, रवि शिंदे, अनिल मोरे, वैभव कंठाळे, विकास निकम यांनी अभिनंदन केले .

## संपादकीय....

# लहरी निसर्गराजा

गत काही दिवसांपासून महाराष्ट्रातील विविध भागांत सुरू असलेल्या अवकाळी पावसाने, सोसाट्याच्या वादळी वा–याने आणि भीषण गारपिटीने अक्षरश: हाहाकार माजवला आहे. ऐन कापणीच्या आणि तोडणीच्या हंगामात निसर्गाच्या या लहरीपणामुळे शेती पिकांचे अपरिमित नुकसान झाले असून बळिराजा पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. द्राक्ष, केळी आणि आंबा यांसारख्या फळबागांसह रबी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा तडा बसला आहे. राज्यातील सांगली, सोलापूर, फलटण, सांगोला, अहिल्यानगर, इंदापूर, बारामती आणि पारगाव या द्राक्षउत्पादक पट्ट्याला अवकाळीचा सर्वाधिक तडाखा बसला. तोडणीच्या उंबरठ्यावर असलेल्या द्राक्ष बागांवर गारपीट झाल्यामुळे द्राक्षांचे मणी तडकले असून मालाचा दर्जा खालावला आहे.

निर्यातक्षम द्राक्षांचे नुकसान झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील संधी हुकली असून स्थानिक बाजारपेठेतही द्राक्षांच्या दरात सुमारे ३० टक्क्यांनी मोठी घसरण झाली आहे. कष्टाने पिकवलेला माल कवडीमोल भावाने विकण्याची वेळ शेतक–यांवर आली आहे. केवळ फळबागाच नव्हे तर गहू, मका, ज्वारी, बाजरी आणि कांदा यांसारख्या पिकांचेही अतोनात नुकसान झाले आहे. छत्रपती संभाजीनगर आणि पुणे जिल्ह्यातही कांदा व हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील सुमारे १ लाख २२ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिके या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाली आहेत. मराठवाडा आणि विदर्भातील धाराशिव, लातूर, बीड या जिल्ह्यांमध्ये 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला होता. जळगावमधील चिंचोली परिसरात वादळी वा–यामुळे केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या असून काही शेतक–यांचे ८–१० लाख रुपयांचे अपेक्षित उत्पन्न एका रात्रीत मातीमोल झाले आहे.

या भीषण परिस्थितीची दखल घेत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी तातडीने नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून परिस्थितीची पाहणी केली. राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने थैमान घातले असून शेतक–यांचे नुकसान अत्यंत गंभीर आहे, असे ते म्हणाले. प्रशासनाला तातडीने नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून बाधित शेतक–यांना लवकरात लवकर आर्थिक मदत दिली जाईल, असे आश्वासन भरणे यांनी दिले. शासन या कठीण काळात शेतक–यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असेही ते म्हणाले. मराठवाड्यात अवकाळी पाऊस, वादळ, जोरदार वारा आणि गारपिटीमुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून विशेषत: आंबा बागांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे आंबा उत्पादनात ५० ते ६० टक्के घट होण्याची शक्यता आहे. यंदा आंब्याचा मोहोर साधारण एक महिना उशिराने आला. मोहोराच्या काळात कडाक्याची थंडी दीर्घकाळ टिकल्याने फुलांचे फळात रुपांतर होण्याची प्रक्रिया मंदावली.

# राष्ट्रीय हँडबॉलपटू मैथिली सुरेश धस हिला राज्य शासनाची क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर

## आष्टीच्या कन्येचा मानाचा बहुमान

आष्टी – (राजेंद्र लाड)

तालुक्यातील अनिषा ग्लोबल स्कूलची विद्यार्थिनी आणि उदयोन्मुख राष्ट्रीय हँडबॉलपटू मैथिली सुरेश धस हिने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कामगिरीच्या जोरावर आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. गुजरात राज्यातील पवित्र सोमनाथ येथे पार पडलेल्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय प्रदर्शन केल्याबद्दल महाराष्ट्र शासन तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून तिला मानाची क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आष्टी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोमनाथ येथे पार पडलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील बलाढ्य संघांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या आणि स्पर्धात्मक वातावरणात मैथिलीने आपल्या कौशल्याचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. मैदानावर तिची चपळता, अचूक टायमिंग, बचाव आणि आक्रमणातील समतोल, तसेच संघभावना या गुणांमुळे ती विशेष ठरली. निर्णायक क्षणी केलेले गोल, सहकाऱ्यांना दिलेली अचूक साथ आणि खेळातील सातत्य यामुळे तिने महाराष्ट्र संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला.

तिच्या या सर्वांगीण कामगिरीची दखल घेत राज्य शासनाने तिला क्रीडा शिष्यवृत्ती प्रदान करण्याचा निर्णय घेतला. ही शिष्यवृत्ती केवळ आर्थिक मदत नसून, तिच्या भविष्यातील क्रीडा कारकिर्दीसाठी मोठे प्रोत्साहन आणि सन्मानाचे प्रतीक मानले जात आहे. मैथिली धस हिच्या यशामागे तिची प्रचंड जिद्द, कठोर परिश्रम आणि खेळाविषयी असलेली निष्ठा हे महत्त्वाचे घटक आहेत.

शालेय स्तरापासूनच तिने हँडबॉल खेळात आपली ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली होती. नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि स्पर्धांमधील अनुभव यामुळे तिच्या खेळात सातत्याने सुधारणा होत गेली. ग्रामीण पार्श्वभूमीतून येत असतानाही तिने अडचणींवर मात करत राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचा ध्यास घेतला. तिच्या या प्रवासात कुटुंबियांचा पाठिंबा देखील तितकाच महत्त्वाचा ठरला आहे.

मैथिलीच्या या यशामध्ये तिच्या शाळेतील क्रीडा शिक्षकांचे योगदान अनन्यसाधारण आहे. क्रीडा शिक्षक अजिम शेख, निलेश मुरकुटे आणि दिपाली काकडे यांनी तिला खेळातील तांत्रिक बाबी, रणनीती, फिटनेस आणि मानसिक तयारी याबाबत सातत्याने मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रशिक्षकत्वाखाली मैथिलीने आपल्या खेळातील कमतरता दूर करत एक परिपूर्ण खेळाडू म्हणून स्वत:ला घडवले. शाळेच्या क्रीडामैदानावर घेतलेला नियमित सराव, विविध स्पर्धांमध्ये सहभाग आणि प्रशिक्षकांनी दिलेला आत्मविश्वास यामुळेच ती राष्ट्रीय स्तरावर झळकू शकली. मैथिलीच्या या यशामुळे अनिषा ग्लोबल स्कूलचा लौकिक अधिकच वाढला असून, शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल राज्यस्तरावर घेतली जात आहे. तसेच आष्टी तालुका आणि संपूर्ण जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला एक नवी दिशा मिळाली आहे. ग्रामीण



भागातील विद्यार्थ्यांसाठी मैथिली हे एक प्रेरणास्थान ठरले आहे.

मैथिलीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार सुरेश धस, सौ. प्राजक्ताताई धस, देवस्थान ट्रस्टचे सर्व विश्वस्त, शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे मनापासून अभिनंदन केले. तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना, भविष्यात ती आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताचे प्रतिनिधित्व करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. राज्य शासनाची ही क्रीडा शिष्यवृत्ती मैथिलीच्या क्रीडा प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, तिच्या आगामी स्पर्धांसाठी ती अधिक जोमाने तयारी करणार आहे. तिच्या यशामुळे आष्टी तालुक्यातील अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा मिळत असून, क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्याची नवी उमेद निर्माण झाली आहे. मैथिली धस हिच्या या उल्लेखनीय यशामुळे आष्टी तालुक्याच्या क्रीडा इतिहासात अभिमानाचा नवा अध्याय जोडला गेला असून, तिच्या पुढील वाटचालीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# बीडसांगवीत पोलिस कॉन्स्टेबलपदी निवड झालेल्या युवकांचा ग्रामस्थांकडून सत्कार

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील डोंगराळ ग्रामीण भागातील कणसेवाडी–बीडसांगवी परिसरातील तीन युवकांची पोलिस कॉन्स्टेबलपदी निवड झाल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशस्वी युवकांचा बीडसांगवी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्या वतीने रविवार दि. ५ एप्रिल रोजी भैरवनाथ मंदिर परिसरात भव्य व दिमाखदार सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. कणसेवाडी–बीडसांगवी येथील शेतकरी पोपट करडुळे यांचे सुपुत्र प्रदीप पोपट करडुळे यांची अहिल्यानगर येथे पोलिस कॉन्स्टेबलपदी निवड झाली आहे. तसेच कणसेवाडी येथील शेतकरी रोहीदास बावणे यांचे सुपुत्र नागेश रोहीदास बावणे यांची पिंपरी–चिंचवड येथे पोलिस कॉन्स्टेबलपदी निवड झाली आहे. याशिवाय बीड जिल्हा गुप्तवार्ता विभागातील अधिकारी चंद्रहार सर्जेराव करांडे यांचे सुपुत्र यश चंद्रहार करांडे पाटील यांची पालघर येथे पोलिस कॉन्स्टेबलपदी निवड झाली आहे.

या तिन्ही युवकांनी कठोर परिश्रम, जिद्द व चिकाटीच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे गावाच्या नावाला मानाचा तुरा मिळाला असून, त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बीडसांगवी येथील प्रथम



नागरिक तथा सरपंच नंदकिशोर करांडे होते. यावेळी ह.भ.प. जालींधर महाराज नरवडे, माजी सरपंच बबनराव करांडे, सेवा सोसायटीचे चेअरमन सुभाष तात्या गणगे, आमदार सुरेश अण्णा धस यांचे स्वीय सहायक विकास तात्या साळवे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास यासिन शेख, शिवदास नरवडे, रंजित ढोबळे, उत्तम देवकर, रामराम शेळके, हिराजी बावणे, विठ्ठल शेळके, संदीप करांडे, विठ्ठल कणसे, लक्ष्मण दिवटे, संजय बावणे, प्रशांत घुमरे, कल्याण मोहरकर, आसाराम पाटील, बारकु ढोबळे, महादेव चव्हाण, बाळासाहेब काका करांडे, राजाभाऊ चव्हाण, जाकीर शेख, दिपक कासवा, आरेफ सय्यद, बंडा घुले, दिलीप गणगे, विजय धनवे, नामदेव जाधव, गोरख ढोबळे, विजय करांडे, विजय डुकरे, आशाताई करांडे, शोभाताई करांडे, महादेव ढोबळे, हारी नरवडे, संतोष नरवडे, ललेश नरवडे, महावीर नरवडे, युवराज नरवडे, गोरख नरवडे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारमूर्तींना पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी युवकांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच इतर युवकांनीही त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विकास तात्या साळवे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन पोपट करडुळे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



## बेलगावच्या विकासाला गती : सिमेंट रस्ता व बंधाऱ्याचे उद्घाटन उत्साहात संपन्न

आष्टी – (प्रतिनिधी)

तालुक्यातील बेलगाव येथे ग्रामविकासाला चालना देणाऱ्या महत्त्वपूर्ण कामांचा शुभारंभ उत्साहात पार पडला. आमदार सुरेश धस (अण्णा) यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या नवीन सिमेंट कॉंक्रीट रस्ता व सिमेंट बंधाऱ्याचे उद्घाटन रविवार, दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी युवक नेते सागर धस (आप्पा) धस यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी पारंपरिक पद्धतीने श्रीफळ वाढवून व पूजा करून कामांचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटन सोहळ्यावेळी ग्रामस्थांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. कार्यक्रमाला गावचे सरपंच तात्यासाहेब शिंदे, उपसरपंच सतीश पोकळे, माजी सरपंच जयसिंग पोकळे, ज्येष्ठ पत्रकार अँड. सीताराम पोकळे, भाजपाचे ज्येष्ठ नेते कल्याणराव पोकळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मार्गदर्शक श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, भाऊसाहेब (दादा) पोकळे, माजी उपसरपंच सदाशिव (अण्णा) पोकळे, प्राचार्य भाऊसाहेब ढोबळे, युवा उद्योजक प्रवीण वारे, उद्योजक ज्ञानेश्वर पोकळे, माजी सरपंच सुनील ढोबळे, एकनाथ पोकळे, दगडू दादा पोकळे, गणेश खोटे, विक्रम बापू पोकळे, रवींद्र ढोबळे, दादासाहेब पोकळे, पोपट खंडागळे, संपत पोकळे, शिवम पोकळे, राजू खंडागळे, सुदाम पोकळे, शरद पोकळे, मारुती सरोदे, शिवाजी पोकळे, काकासाहेब पोकळे, रामदास पोकळे, शहाजी पोकळे, राजेंद्र पोकळे, बाळू पाखरे, दीपक पोकळे, दादासाहेब खंडागळे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना युवक नेते सागर (आप्पा) धस यांनी बेलगावच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. त्यांनी गावातील रस्ते, पाणी साठवणूक आणि शेतीसाठी उपयुक्त अशा कामांना प्राधान्य दिले जाईल, असेही सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य भाऊसाहेब ढोबळे यांनी उपस्थित मान्यवरांचे व ग्रामस्थांचे आभार मानले. या कामांमुळे बेलगावच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून ग्रामविकासाला निश्चितच नवी दिशा मिळणार आहे.

# पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो खो (पुरुष) स्पर्धा:महाराष्ट्रातील चार विद्यापीठ पात्रता फेरीत दाखल

## नांदेड, छत्रपती संभाजीनगर,पुणे व मुंबई संघ विजेतेपदासाठी झुंजणार

नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या क्रीडा मैदानावर पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो खो (पुरूष) स्पर्धा सुरू आहेत. बाद फेरीतून पात्रता फेरीत दाखल होण्यासाठी संघात मोठी चुरस निर्माण झाली होती. अतिशय चुरशीचे व अटीतटीच्या सामन्यात महाराष्ट्रातील चार विद्यापीठाने बाजी मारली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे आणि मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठांनी पात्रता फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.

येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या क्रीडांगणावर पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो खो (पुरूष) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पाच राज्यातील विविध विद्यापीठाचे संघ सहभागी झाले आहेत. दि.५ एप्रिल, २०२६ रोजी सकाळच्या सत्रात बाद फेरीतून आलेले चार विद्यापीठाचे संघ अनुक्रमे गोवा, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर संघ पात्रता फेरीत दाखल होण्यासाठी प्रतिस्पर्धी संघाशी झुंजले. परंतु या संघाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे पात्रता फेरीत दाखल होण्याचे स्वप्न भंगले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघाने गोवा विद्यापीठ, गोवा संघावर ११ गुणांनी मात केली. त्यामुळे नांदेड विद्यापीठाने पात्रता फेरीत सहज प्रवेश केला. त्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र–कुलगुरू डॉ.अशोक महाजन, कुलसचिव डॉ.डी.डी.पवार, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ.भास्कर माने, संघाचे प्रशिक्षक पवन पाटील, व्यवस्थापक महेश वाखरडकर आदींनी संघाचे कौतुक केले.

मुंबई विद्यापीठ व संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती यांच्यात अत्यंत अटीतटीच्या सामन्यात मुंबई विद्यापीठ ५ गुणांच्या फरकाने विजयी झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्यात सामना रंगला छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ संघ ६ गुणांच्या फरकाने विजयी झाले. सावित्रिबाई फुले विद्यापीठ पुणे व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघातील सामना रंगतदार झाला. क्षणाक्षणाला उत्कंठावर्धक सामन्यात पुणे विद्यापीठाने १ गुणांच्या फरकाने सामना जिंकला.

पात्रता फेरीत दाखल झालेल्या महाराष्ट्रातील चार संघात आता साखळी सामने होणार आहेत. चारही संघात दमदार, गुणी, आक्रमण व बचावात्मक कौशल्यात निपुण असलेल्या अष्टपैलू खेळाडूंची संख्या आहे. त्यामुळे या चार संघात कोण विजयी व उपविजयी ठरणार आहे. याची क्रीडा प्रेमींना मोठी उत्सुकता लागली आहे. दि.६ एप्रिल रोजी यांचा निर्णय होणार असून बक्षिस वितरण कार्यक्रम याच दिवशी सायंकाळी होणार आहे.

# हाजीपूर येथे श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा

धार्मिक कार्यक्रमांची भव्य मेजवानी

आष्टी – (राजेंद्र लाड)

तालुक्यातील हाजीपूर (संत वामनभाऊ नगर) येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. गुरुवर्य परपूज्य संत वामनभाऊ व संत भगवानबाबा यांच्या कृपाशीर्वादाने हा सोहळा पार पडणार असून परिसरातील ग्रामस्थ व भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सोहळ्याची सुरुवात गुरुवार दि. १० एप्रिल २०२६ रोजी होणार असून समारोप शनिवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. या तीन दिवसांच्या कालावधीत विविध धार्मिक विधी, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्राणप्रतिष्ठेचा शुभारंभ होईल. यामध्ये गणेश पूजा, पिठ पूजा, अग्नि स्थापना, देवताचे स्नान, जलअभिषेक व आरती असे विविध धार्मिक विधी पार पडतील. या दिवशी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. वेदांतचार्य राम महाराज शास्त्री यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता शांतिपाठ, पिठ पूजा, देवता होम, मूर्तीचे १०८ स्नान, धान्याधिवास व आरती होईल. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. श्री.महंत गुरुवर्य काशीनाथ महाराज यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. रविवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.१० वाजता ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज (गहिनीनाथ गड) यांच्या शुभहस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा पार पडणार आहे. यानंतर सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे



कीर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रातील कीर्तनकार व मान्यवर सहभागी होणार आहेत. यामध्ये गायनाचार्य ह.भ.प. राजदीप महाराज, संदीप माने, दादा महाराज सातपुते, मृदुंगाचार्य ह.भ.प. बाळकृष्ण राऊत, हार्मोनियम ह.भ.प. बाबासाहेब वाल्हेकर, चोपदार ह.भ.प. आजिनाथ राख, खंडू सानप यांचा समावेश असणार आहे. कार्यक्रमासाठी मंडप डेकोरेशनची जबाबदारी सुळे मंडप डेकोरेशन यांनी घेतली आहे.

या सोहळ्याचे आयोजन समस्त गावकरी मंडळी, हाजीपूर (संत वामनभाऊ नगर), ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीने करण्यात आले असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या भव्य धार्मिक सोहळ्यामुळे हाजीपूर परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्सुकता पाहायला मिळत आहे. अशी माहिती हाजीपूर चे मा. सरपंच विठ्ठल राख व आदर्श शिक्षक कल्याण वाल्हेकर यांनी दिली आहे.

## परतूर येथे लड्डा कॉलनीच्या समोर चिकणी इनामी परिसरात


# महावितरणचा जीवघेणा हलगर्जीपणा मशिदीसमोरच लटकतायत मृत्यूच्या तारा

परतूर (प्रतिनिधी )

शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील लड्डा कॉलनीच्या समोर असलेल्या चिकणी इनामी परिसरात महावितरणचा अत्यंत भोंगळ कारभार समोर आला आहे. या भागातील विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य तारा आणि मीटरचे वायर अक्षरशः जमिनीला टेकण्याच्या स्थितीत असून, यामुळे एखाद्याचा बळी जाण्याची वाट महावितरण पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

मशिदीसमोर झुकून जाण्याची वेळ विशेष म्हणजे, येथील खाजा गरीब नवाज मशिदीच्या अगदी समोरच या विद्युत तारा लोंबकळत आहेत. मशिदीत नमाज पठण करण्यासाठी येणाऱ्या भाविकांना या जीवघेण्या तारांखाली झुकून आत जावे लागत आहे. एखादा अर्थिंग किंवा फेज वायरचा स्पर्श झाल्यास मोठी दुर्घटना घडू शकते, तरीही प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. तसेच

परिसरातील विद्युत तारांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अनेक ठिकाणी तारा तुटलेल्या असून त्या केवळ 'जोडून घेतलेला आहे तसेच मीटर मधून आलेले



वायर मध्ये सेलो टेप' किंवा 'ब्लॅक टेप' लावून जुळवण्यात आल्या आहेत. या तात्पुरत्या मलमपट्टीमुळे पावसाळ्यात किंवा वाऱ्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याची किंवा करंट उतरण्याची दाट शक्यता आहे. गल्लीत खेळणाऱ्या लहान मुलांचा हात सहज या तारांना लागू शकतो.वाहनधारक: रस्त्यावरून दुचाकी किंवा चारचाकी वाहन गेल्यास तारा वाहनाला अडकून मोठा अपघात होऊ शकतो. नवीन पोलची गरज: या भागात मीटर बसवण्यासाठी खांबांची (पोल) कमतरता असल्याने तारा खाली आल्या आहेत. येथे त्वरित नवीन पोल बसवणे तांत्रिकदृष्ट्या गरजेचे आहे.

महावितरणच्या याहलगर्जीपणामुळे चिकणी इनामी भागातील नागरिक सध्या दहशतीच्या छायेखाली वावरत आहेत. रहिवासी न सांगितलेला आहे की आम्ही वारंवार सांगूनही याकडे लक्ष दिले जात नाही. जर येथे एखादी जीवितहानी झाली, तर त्याला पूर्णपणे महावितरणचे अधिकारी जबाबदार असतील, असे मत स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केले आहे. तसेच चडएइ (महावितरण) प्रशासनाने त्वरित या तारांची दुरुस्ती करून, नवीन पोल बसवावेत आणि नागरिकांना भयमुक्त करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

## ६ एप्रिलपासून घुंगर्डे हादगावात खंडोबा यात्रेचा जल्लोष भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित

घुंगर्डे हादगाव ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथे गल्हाटी नदीकाठी वसलेल्या खंडोबा मंदिरात येत्या ६ एप्रिलपासून वार्षिक यात्रेला सुरुवात होत असून, दोन दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.चैत्र पंचमी निमित्त भरविण्यात येणाऱ्या या यात्रेसाठी घुंगर्डे हादगावसह आसपासच्या गावांमधून हजारो भाविक उपस्थित राहणार असून नवसाला पावणारा देव म्हणून प्रसिद्ध असलेल्या खंडोबाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे.

निसर्गरम्य परिसरात वसलेले हे मंदिर वर्षभर भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र राहिले असून, यात्रेनिमित्त येथे विशेष आकर्षण निर्माण होते.ग्रामपंचायत व विविध सामाजिक संस्थांच्या वतीने भाविकांसाठी पिण्याचे पाणी सभामंडप व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवून यात्रेची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

यात्रेच्या पहिल्या दिवशी सकाळी ९ ते ११ वाजता श्रींची पूजा व अभिषेक, तर दुपारी ४ ते ७ वाजता बारा गाड्या ओढण्याचा पारंपरिक कार्यक्रम होणार आहे. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत पालखी मिरवणूक मोठ्या भक्तिभावात पार पडणार असून, पहाटे ५ वाजता लंगर तोडण्याचा विधी होईल.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ एप्रिल रोजी पारंपरिक कुस्त्यांचा कार्यक्रम रंगणार असून यात स्थानिक तसेच बाहेरील मल्ल सहभागी




होणार आहेत.खंडोबा हे घुंगर्डे हादगावकरांचे ग्रामदैवत असल्यामुळे,मुंबई,पुणे, नाशिक,संभाजीनगर, अहिल्यानगर आदी शहरांत नोकरी-व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले ग्रामस्थही या यात्रेसाठी खास गावाकडे येतात. गावात प्रत्येक घरातून भाविक दर्शनासाठी हजेरी लावत असल्याने यात्रेला एक वेगळेच सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या यात्रेत खंडोबाची गावातून वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून ग्रामस्थ मोठ्या उत्साहात सहभाग घेणार आहेत.यात्रेच्या पार्श्वभूमीवर गोंदी पोलीस ठाण्याचे निरीक्षक अशिष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## शैक्षणिक उपक्रमातून साजरा झाला बळीराम भाऊ राऊत यांचा अभिष्टचिंतन सोहळा

अंबड ।प्रतिनिधी

अंबड शहरातील सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असलेले मा.श्री बळीराम भाऊ राऊत अध्यक्ष श्री संत संताजी जगनाडे महाराज सेवाभावी संस्था जिल्हाध्यक्ष तैलिक महासभा जालना तथा मुख्य संपादक अंबड वार्ता यांचा वाढदिवस यंदा एका स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रमातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



वाढदिवसानिमित्त विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून समाजाभिमुख संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आणि उपस्थितांकडून भाऊंच्या या कार्याचे मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात आले.या कार्यक्रमाला नगराध्यक्ष केदार दादा कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.तसेच नगरसेवक गंगाधर भाऊ वराडे,अफरोज पठाण, संदिप दादा खरात, जितेंद्र बुर्ले, अर्जुन भाऊ भोजणे, सचिन खरात आरोग्य व स्वच्छता सभापती यांच्यासह प्रसाद झाडे, अभिजित कुलकर्णी,संजय जाधव सर,सुनिल भाऊ राऊत, योगेश सोनवणे,अजय दळवी, अनंता राऊत,रघुनाथ राऊत, शुभम भिसे,योगेश हरणे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी बोलताना संदिप दादा खरात यांनी सांगितले की बळीराम भाऊ हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. त्यांच्या कार्यामुळे अंबडसह संपूर्ण जालना जिल्ह्यात त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

तर नगराध्यक्ष केदार दादा कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात भाऊंच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की समाजासाठी झटणारे आणि नव्या उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे बळीराम भाऊ राऊत.वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप हा अतिशय प्रेरणादायी उपक्रम आहे.

कार्यक्रमात शाळेचे शिक्षक श्री सोपान घाडगे सर,श्री प्रमोद मस्के सर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## जालना जिल्ह्यातील साहित्यिक चळवळीस गतिमान करण्यासाठी एकत्र यावे - राजेश टोपे यांचे आवाहन

जालना ।शेख फारुक

जालना जिल्ह्यातील साहित्यिक,कवी,लेखक आणि कलावंतांनी एकत्र येऊन साहित्यिक चळवळ अधिक गतिमान करावी असे प्रभावी आवाहन माजी मंत्री राजेश टोपे यांनी केले.येथील यशवंतराव चव्हाण साहित्यिक सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने कर्मयोगी स्व.अंकुशराव टोपे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित भव्य त्रिभाषिक मराठी-हिंदी-उर्दू कविसंमेलनात ३० कवींना पुष्पहार व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना टोपे म्हणाले की स्व.अंकुशराव टोपे यांनी उभारलेले हे व्यासपीठ मराठवाड्यातील लेखक, विचारवंत,कवी आणि कलावंतांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून आयोजित विसावे मराठवाडा साहित्य संमेलन हे अखिल भारतीय स्तरावरील संमेलनालाही मागे टाकणारे ठरले होते.या संमेलनाची दखल माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी घेतली होती असे त्यांनी नमूद केले.

बाबा आमटे यांच्या स्वरानंदवन या उपक्रमासह सुप्रसिद्ध कलावंत सुरेखा पुणेकर यांच्या विशेष सत्काराने या परंपरेला अधिक उंची मिळाली.त्या वेळी २० हजारांहून अधिक रसिकांची उपस्थिती लाभली होती याची आठवण टोपे यांनी करून दिली.राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कार,मराठी नाटके आणि विशेष व्याख्यानमालेच्या माध्यमातून प्रतिष्ठान सातत्याने साहित्याची सेवा करत असल्याचे त्यांनी सांगितले.

हे व्यासपीठ सर्व साहित्यिकांसाठी खुले आहे चला आपण सर्व मिळून नव्या उपक्रमांचे साक्षीदार होऊया असे आवाहन करत त्यांनी उपस्थितांचे स्वागत



केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे कार्यवाह प्रा. बसवराज कोरे यांनी केले. व्यासपीठावर डॉ.राजेंद्र गायकवाड,डॉ.दादासाहेब गजहंस,कवी संमेलनाचे अध्यक्ष शिवकुमार बैजल,संजीवनी तडेगावकर,रेखाताई बैजल, रवींद्र तौर,बाळासाहेब तनपुरे, डॉ.रावसाहेब ढवळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कविसंमेलनात उर्दूचे ६, हिंदीचे ८ आणि मराठीचे १५ कवी सहभागी झाले. उर्दू साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त प्रा.अब्दुल अरमान तसेच साहित्यिक उपक्रमांसाठी डॉ. यशवंत सोनुने यांचा सत्कार करण्यात आला.

कविसंमेलनात सुनील लोणकर, पंढरीनाथ सारके,प्रभाकर शेळके, विनोद जैमहाल, नारायण खरात,अशोक डोरले, मनीष पाटील,रेखा गतखणे, स्वाती रत्नपारखी,अशोक खेडकर,कृष्णा कदम,पंडित रानमाळ,दीपक राखुंडे,वैशाली फोके,सत्यशिला तौर,एकनाथ शिंदे,दिनेश शेळके,लियाकत अलीखान,बशारत अलीखान, मौलाना अब्दुल फरहान आदी कवींनी आपल्या प्रभावी रचनांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने रसिकांची उपस्थिती लाभली.सूत्रसंचालन राज रणधीर यांनी केले,तर आभार प्रदर्शन शंकर तिकांडे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले अशी माहिती कार्यवाह बसवराज कोरे यांनी दिली.

## भोकरदनच्या विजयी नेतृत्वाचा मुंबईत भव्य सत्कार राष्ट्रवादी भवनात दिमाखदार सोहळा

भोकरदन ।प्रतिनिधी

भोकरदन नगरपरिषद निवडणुकीत घवघवीत यश संपादन करत बहुमताने सत्तास्थानी आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा मुंबईतील राष्ट्रवादी भवन येथे आज भव्य व दिमाखदार सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. संपूर्ण कार्यक्रमात विजयानंतरचा जल्लोष, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नेतृत्वावरील विश्वास यांचे दर्शन घडले.या सोहळ्याला पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.आ.शशिकांत शिंदे तसेच राज्याचे माजी मंत्री मा.आमदार राजेश भैय्या टोपे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते भोकरदनमधील ऐतिहासिक विजयामागील प्रमुख शिल्पकार मा.आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला.

याचबरोबर विजयी ठरलेले सर्व नगराध्यक्ष, नगरसेवक तसेच निवडणुकीत मोलाची भूमिका बजावणारे पक्षनिरीक्षक ड. संजय काळबांडे, युवानेते सुधाकर अण्णा दानवे यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास जालना जिल्ह्याचे पक्षनिरीक्षक मा.आ.संजय वाघचौरे, शमीमभाई मिर्झा, गटनेते शफीक पठाण, उपनगराध्यक्ष राजेंद्र जाधव, नगरसेवक नसीम पठाण, नईम कादरी, अब्दुल



कादिर, अजहर शहा, चंद्रकांत पगारे, धनराज भारती, आमेर पठाण, महेश औटी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना मा.आमदार चंद्रकांत दानवे म्हणाले आजचा हा सन्मान केवळ व्यक्तींचा नसून भोकरदनच्या जनतेच्या विश्वासाचा आहे. कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे हा विजय शक्य झाला. येणाऱ्या काळात पारदर्शक,लोकाभिमुख आणि विकासाभिमुख कारभार करून प्रत्येक नागरिकाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही आपल्या भाषणात भोकरदनमधील निकालाचे कौतुक करत सांगितले की हा विजय म्हणजे मा. शरदचंद्र पवार यांच्या विचारसरणीवर व स्थानिक नेतृत्वावर जनतेने दाखवलेला ठाम विश्वास आहे.विकासाच्या नव्या पर्वाची नांदी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात सर्व विजयी उमेदवारांचा गौरव करण्यात आला. या ऐतिहासिक विजयामुळे भोकरदन शहरात विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.एकंदरीतच, मुंबईत झालेला हा भव्य सत्कार सोहळा भोकरदनच्या राजकारणात नव्या उमेदीचा आणि विकासाच्या दिशेने टाकलेल्या ठाम पावलांचा साक्षीदार ठरला.

## आष्टीत महात्मा फुले व डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर १२० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

क्रांती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था व रावण ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

आष्टी (प्रतिनिधी)

महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान गुरू-शिष्यांच्या जयंतीनिमित्त आष्टी शहरात सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. क्रांती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था व रावण ग्रुप, आष्टी तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ५ एप्रिल रोजी ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय येथे आयोजित या शिबिरात तब्बल १२० युवक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मानवतेची सेवा केली.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. सोपानराव निंभोरे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, प्रा. रवि सातभाई व ड. किशोर निकाळजे यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे समाजातील महत्त्व अधोरेखित करत अशा उपक्रमांमुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळते, असे सांगून आयोजकांचे विशेष कौतुक केले. आष्टी शहरात सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था व रावण ग्रुपकडून मागील चार वर्षांपासून सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित शिबिरात युवकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.




या शिबिराच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष सुहास पगारे, उपाध्यक्ष गौरव निकाळजे, सचिव विजय शिंदे यांच्यासह सौरभ निकाळजे, ऋषिकेश कांबळे, वीरेंद्र निकाळजे, साई पारेकर, यश साळवे, सुशांत साळवे, श्रेयस निकाळजे, आकाश निकाळजे, ओम काकडे, विकास मोरे, कुणाल निकाळजे, अविनाश निकाळजे, रोशन शिंदे, मोहित कांबळे, नितीन निकाळजे, किरण कुराडे, आकाश कुराडे आदी सदस्यांनी परिश्रम घेतले. तसेच करमाळा येथील कमला भवानी ब्लड सेंटरचे डॉ. आकाश सोनवणे, ओमप्रकाश बेलपत्रे व इफ्रान अत्तार यांनी वैद्यकीय सेवा व सहकार्य प्रदान करून शिबिर यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली. एकूणच, सामाजिक जाणीव जागृत ठेवत रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून आष्टीतील युवकांनी दिलेला प्रतिसाद प्रेरणादायी ठरला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सजावटीतील प्लास्टिक फुलांवर प्रशासनाचा 'कडक हात'

## नियम मोडणाऱ्यांवर थेट कारवाईचा इशारा!

मंठा / डॉ. आशिष तिवारी

पर्यावरणाचा ऱ्हास आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या सजावटीतील प्लास्टिक फुलांच्या वापरावर आता प्रशासनाने थेट आक्रमक भूमिका घेतली असून, नियम धाब्यावर बसवणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

प्लास्टिक फुले म्हणजे केवळ दिखावा नव्हे, तर पर्यावरणासाठी 'धोक्याची घंटा' ठरत आहेत. या फुलांमधील घातक रसायने जाळल्यानंतर किंवा दीर्घकाळ संपर्कात आल्यास गंभीर आजारांना आमंत्रण देतात. तरीही डेकोरेटर, विक्रेते आणि आयोजकांकडून सर्रास वापर सुरूच असल्याने प्रशासन संतप्त झाले आहे.राज्यात प्लास्टिक बंदी लागू असतानाही खुलेआम नियमांची पायमल्ली होत असल्याचे चित्र आहे. लग्नसमारंभ, राजकीय कार्यक्रम आणि विविध सोहळ्यांमध्ये प्लास्टिक फुलांचा वाढता वापर म्हणजे पर्यावरणाशी थेट छेडछाड असल्याची टीका होत आहे.आता यापुढे कुणालाही सवलत दिली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत प्रशासनाने डेकोरेटर, विक्रेते, हॉल मालक आणि आयोजकांवर थेट कारवाईचा बडगा उगारण्याची तयारी दर्शवली आहे. दंडात्मक कारवाईसोबतच परवाने रद्द करण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे.नागरिकांनीही सजावटीसाठी नैसर्गिक पर्यायांचा अवलंब करावा, अन्यथा नियम मोडणाऱ्यांना 'कायद्याचा चाबूक' बसणार, हे आता स्पष्ट झाले आहे.

## सांगवी पाटण येथे भैरवनाथ यात्रा उत्साहात संपन्न नवसपूर्तीसाठी ९० किलो पेढ्यांचे वाटप

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान असलेल्या भैरवनाथ मंदिराची वार्षिक यात्रा यंदा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी यात्रेला मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून भैरवनाथाचे दर्शन घेतले. विविध धार्मिक विधी, पारंपरिक मिरवणुका आणि नवसपूर्तीच्या कार्यक्रमांमुळे संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले होते. यात्रेच्या प्रारंभी १ एप्रिल रोजी श्री क्षेत्र पैठण नागतळा येथून आलेल्या कावडीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील प्रमुख मार्गांवरून ढोल-ताशांच्या गजरात कावडीचे स्वागत करण्यात आले. २ एप्रिल रोजी सकाळी शेरनी, दंडवत, लोटांगण अशा पारंपरिक



पद्धतींनी भाविकांनी आपले नवस पूर्ण केले.

दरम्यान, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस हे सर्वाधिक मताधिक्याने निवडून यावेत, असा नवस सांगवी पाटण गावचे सरपंच दत्तात्रय खोटे व ग्रामस्थांनी केला होता. हा नवस पूर्ण झाल्याने सरपंच दत्तात्रय खोटे यांनी ९० किलो पेढ्यांचे वाटप करून नवसपूर्तीचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला. या प्रसंगी ह.भ.प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री, युवानेते जयदत्त भैय्या धस, उद्योजक पांडुरंग सोनवणे यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच डॉ. पंडित दादाराव खिलारे यांच्या हस्ते भैरवनाथाला चांदीचा घोडा अर्पण करण्यात आला.

दुपारी तीन ते सहा या वेळेत बँड, हलगी पथक आणि ढोल-ताशांच्या तालावर युवकांनी उत्स्फूर्तपणे नृत्य करत यात्रेचा आनंद लुटला. भव्य-दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. सायंकाळी सहा ते आठ दरम्यान आंबील, घुगऱ्या व शेरनी वाटपाची जुनी परंपरा जपण्यात आली. रात्री छबिना काढून गावातून रात्रभर मिरवणूक काढण्यात आली, ज्यात भाविकांचा मोठा सहभाग दिसून आला. यात्रेनिमित्त खेळणी, खाद्यपदार्थ व महाप्रसादाच्या दुकानांनी गाव गजबजून गेले होते. सांगवी, पाटण, कोहिनी, खिळद, बावी, डोईठाण, सुरुडी, धामणगाव, कारखेल, लमाणतांडा यांसह पुणे, मुंबई, अहमदनगर आणि राज्यातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा प्रकारे श्रद्धा, परंपरा आणि उत्साह यांचा संगम असलेली सांगवी पाटण येथील भैरवनाथ यात्रा यंदा थाटामाटात व भक्तिभावात संपन्न झाली.

# शिवस्मारकाचा प्रश्न केवळ विकासाचा नसून भावनांचा आहे

## दुर्लक्ष कराल तर मोदी आणि फडणवीस सरकारला राजकीय गंभीर परिणाम भोगावे लागतील – रामहरी मेटे

## स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांनी पाहिलेल्या शिवस्मारकाच्या स्वप्न पूर्ततेसाठी जय शिवसंग्राम राज्यभर आंदोलन छेडणार..!



### शिवबाच्या महाराष्ट्रात शिवस्मारकासाठी ३० वर्ष संघर्ष करावा लागतो हे लाजिरवाणे ?

१४ जून १९९६ ला तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी शिवस्मारक उभारण्याची घोषणा महायुतीच्या सत्तेत असताना केली. तेव्हापासून शिवस्मारक उभारण्याच्या संकल्पनेला २०२६ उजाडले तरीदेखील न्याय मिळत नाही.जो महाराष्ट्र शिवबाने घडवला, स्वराज्याच्या स्वाभिमानाचा नारा या महाराष्ट्रात दिला. त्याच महाराष्ट्राच्या अरबी समुद्रात शिवरायांचे शिवस्मारक तीस वर्षापासून उभारले जात नाही ? ही बाब निश्चितच लाजिरवाणी आहे.स्वर्गीय तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, स्वर्गीय तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथराव मुंडे,शिवस्मारक समितीचे अध्यक्ष स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्यासह अनेकांनी शिवस्मारकांच्या उभारणीसाठी केलेले प्रामाणिक प्रयत्न सरकारच्या नाकर्तेपणामुळे निष्फळ ठरत आहेत का ? असा प्रश्न शिवप्रेमींच्या मनात उभारला जात आहे.

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक ठरणाऱ्या भव्य शिवस्मारकाच्या कामाला ३० वर्षापासून वर्षानुवर्षे विलंब होत असल्याने राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर शिवस्मारक समितीचे तत्कालीन अध्यक्ष स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे लहान भाऊ जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी सरकारला जाब विचारण्यासाठी जय शिवसंग्राम येणाऱ्या १४ ऑगस्ट २०२६ रोजी स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांच्या स्मृतीदिना पासून राज्यभरात केंद्रातील मोदी आणि राज्यातील फडणवीस, शिंदे,पवार महायुती सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन करणार असल्याचा थेट इशारा दिला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासारख्या अभिमानाच्या प्रकल्पाकडे सरकारचे हे दुर्लक्ष असह्य आहे. आश्वासने दिली, भूमिपूजन झाले, निधी मंजूर झाला पण प्रत्यक्ष कामाचा वेग मात्र कासवगतीनेही पुढे सरकत नाही. हा विलंब नेमका कोणाच्या फायद्यासाठी ? असा थेट सवाल रामहरी मेटे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांना उपस्थित केला आहे.

शिवस्मारक हा केवळ प्रकल्प नसून तो कोट्यवधी शिवप्रेमींच्या भावनांचा केंद्रबिंदू आहे. मात्र प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि निर्णयक्षमतेच्या अभावामुळे हा प्रकल्प रखडत चालला आहे. दरम्यान, वाढणारा खर्च, बदलणाऱ्या योजना आणि वारंवार होणारे तांत्रिक अडथळे यामुळे जनतेचा संयम आता सुटू लागला आहे.

जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारने ठोस वेळापत्रक जाहीर करून कामाला गती दिली नाही, तर राज्यभरातून जय शिवसंग्रामसह तमाम शिवप्रेमी एकत्र येऊन तीव्र जनआंदोलन उभारले जाईल. हे आंदोलन केवळ निषेधापुरते मर्यादित राहणार नाही, तर केंद्र आणि राज्य शासनाला निर्णय घेण्यास भाग पाडणारे असेल.

शिवप्रेमी संघटनांनीही या भूमिकेला पाठिंबा दर्शवला असून, शिवरायांच्या स्मारकासाठी आता रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नाही, अशी भावना व्यक्त होत आहे. सोशल मीडियावरही संताप व्यक्त होत असून, सरकारविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

तज्ज्ञांच्या मते, प्रकल्पाच्या अंमलबजावणीत सातत्याचा अभाव, प्रशासकीय अडथळे आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ही विलंबाची प्रमुख कारणे आहेत. मात्र याचा परिणाम थेट जनतेच्या भावनांवर होत आहे याचे भान सरकारला कधी येणार ? आता प्रश्न एकच,शिवरायांच्या स्मारकासाठी अजून किती वाट पाहायची ?

राज्य सरकार या वाढत्या असंतोषाची दखल घेऊन तातडीने निर्णय घेणार की जनतेच्या रोषाचा सामना करणार, हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे.

अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे शिवस्मारक उभारण्याची घोषणा केवळ राजकीय स्वार्थासाठीच का ?

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची घोषणा सरकारतर्फे सन २०१४ मध्ये स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या पाठपुराव्यामुळे केली होती. आज २०२६ साल आलं तरी या स्मारकाचं काम पूर्णपणे ठप्प पडलेल आहे. एकेकाळी निवडणुकांच्या तोंडावर शिवस्मारक हे आमचे ध्येय आहे अशी वल्गना करणारे केंद्र आणि राज्य सरकार आज गप्प का ? गेली अनेक वर्ष निवडणुका जवळ आल्या की शिवस्मारक आणि मराठा आरक्षणाच्या मुद्द्यांना जोर दिला जातो. हे विषय उसळी मारून वर आणले जातात, निवडणुका जिंकल्या की याकडे पुन्हा दुर्लक्ष केले जाते हे संताप जनक आहे.



### स्वर्गीय मेटे साहेबांच्या निधनानंतर दुर्दैवाने याचा पाठपुरावा कोणत्याही नेत्याने केला नाही..?

शिवस्मारक समितीचे तत्कालीन अध्यक्ष शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे यांचा १४ ऑगस्ट २०२२ रोजी दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला. या घटनेला जवळपास चार वर्ष पूर्ण होत आले आहेत. दुर्दैवाने त्यांच्या निधनानंतर मेटे साहेबांच्या स्वप्नातील शिवस्मारक अरबी समुद्रात उभारले जावे या प्रश्नावर एकाही नेत्याने पाठपुरावा केला नाही ही दुर्दैवाने वास्तवता आहे.केंद्र आणि राज्य सरकारने येणाऱ्या चार महिन्यात जर शिवस्मारक उभारणीसाठी निर्णायक आणि ठोस भूमिका घेतली नाही तर स्वर्गीय मेटे साहेबांचे अधुरे राहिलेले शिवस्मारकाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जय शिवसंग्राम सह महाराष्ट्रातील तमाम शिवप्रेमी नागरिक हे मेटे साहेबांच्या स्मृतिदिनापासून म्हणजे १४ ऑगस्ट २०२६ पासून केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून जनांदोलन छेडेल असा थेट इशारा जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी केंद्र आणि राज्य सरकारला दिला आहे.



### कसं आहे नेमकं शिवस्मारक....?

महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार शिवरायांचे शिवस्मारक हे मुंबईतील गिरगाव चौपाटीपासून साडेतीन किलोमीटर अंतरावर राजभवनापासून दीड किलोमीटर अंतरावर तर नरिमन पॉईंट पासून पाच किलोमीटर अंतरावर तयार होणार आहे.अरबी समुद्रातील एका खडकाळ भागावर १५.९६ हेक्टर जागेत हे स्मारक शानदार उभारले जाणार आहे.या स्मारकामध्ये संग्रहालय, थिएटर,माहिती देणारी दालनं,उद्यान आणि शिवाजी महाराजांचा ब्राँझचा पुतळा यासह आई तुळजाभवानी देवी मंदिराचा ही समावेश या परिसरात असणार आहे. यासह अनेक गोष्टींचा समावेश आहे. या स्मारकाच्या भूभागावर हेलीपॅडही बांधण्यात येणार आहे. दररोज दहा हजारापेक्षा अधिक पर्यटक या स्मारकाला भेट देतील अशी क्षमता उभारली जाणार आहे. जगातले सगळ्यात उंच हे स्मारक उभारले जाणार आहे. शिवस्मारकाची उंची ही २१२ मीटर तब्बल करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुंबईमध्ये येऊन २४ डिसेंबर २०१६ ला जलपूजन केलं आणि स्मारकाची चर्चा जोरदार वाढली.मात्र दुर्दैवाने दहा वर्षात हा प्रकल्प पूर्ण झाला नाही हे वास्तव आहे. हे केंद्र आणि राज्य सरकारचं मोठं अपयश आहे.



### स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांचे शिवस्मारकाचे स्वप्न सरकार कधी पूर्ण करणार ?

शिवरायांचे शिवस्मारक अरबी समुद्रात जगातील सर्वात उंच स्मारक उभारले जावे हे स्वप्न शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी पाहिलं. त्यांची या प्रश्नावर असलेली धडपड,अभ्यास आणि प्रामाणिकता लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्तिगत लक्ष घालून मेटे साहेबांना शिवस्मारक समितीचे अध्यक्ष केले. मात्र दुर्दैवाने मेटे साहेब जिवंत असताना या शिवस्मारकाच्या मुद्द्यावरून अनेक तांत्रिक अडचणी त्यांच्यासमोर आणल्या गेल्या. त्यावर मेटे साहेबांनी कायदेशीररित्या अभ्यासपूर्ण मांडणी करून शिवस्मारक उभारणीमध्ये आलेले सर्व अडथळे दूर करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. यावर न्यायालय देखील सकारात्मक झाले.मात्र दुर्दैवाने सरकार शिवप्रेमींच्या या भावनिक प्रश्नांवर राजकारण करत आहे का ? असा प्रश्न आता शिवस्मारकाची उभारणी रखडल्यामुळे शिवप्रेमींच्या मनात उभारला जात आहे. जर याचा उद्रेक झाला तर याचे परिणाम सरकारला सोसावे लागतील हे नक्की.

### मोदी – फडणवीस सरकारने हलक्यात घेऊन नये..?

अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकारल्याशिवाय शिवप्रेमी स्वस्थ बसणार नाहीत.शिवस्मारक हा प्रश्न केवळ विकासाचा मुद्दा नाही तर तो शिवप्रेमींच्या भावनांचा विषय आहे. या प्रश्नांना न्याय देण्याऐवजी जर केंद्र आणि राज्य सरकार राजकीय स्वार्थ साधण्यासाठी भिजत घोंगड ठेवणार असेल तर केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारसह महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार मधील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा ताई पवार यांना येणाऱ्या राजकीय वाटचालीमध्ये शिवप्रेमी आणि जय शिवसंग्राम जागा दाखवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.आम्ही सर्वस्व अर्पण करू पण शिवस्मारकाचा लढा पूर्ण झाल्याशिवाय भविष्यात थांबणार नाहीत, असा निर्वाणीचा इशारा मोदी आणि फडणवीस सरकारला जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे लहान बंधू रामहरी मेटे यांनी दिला आहे.



## बुवाबाजी विरुद्ध महाराष्ट्रात कृतीशील कार्यक्रम राबविणार – माधव बावगे

खरात प्रकरणात सामाजिक संघटनां आणि महिलांनी रस्त्यावर उतरले पाहिजे – संजय बनसोडे

परळी / प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रात भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाने धर्माच्या नावावर धर्माच्या नावावर सर्वसामान्य सर्वसामान्य नागरिकांना आणि महिलांना कसे फसविले जाते हे पुन्हा एकदा उघड झाले आहे.त्यामुळे बुवाबाजी विरुद्ध महाराष्ट्रात कृतीशील कार्यक्रम राबविणार असल्याचे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याचे अध्यक्ष माधव बावगे यांनी केले.तर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा कार्यकर्ता हा प्रशिक्षित असला पाहिजे यासाठी प्रशिक्षण शिबीरावर भर देण्यात येईल. तसेच खरात प्रकरणात महाराष्ट्रातील सामाजिक संघटना व महिलांनी रस्त्यावर उतरायला पाहिजे असे महाराष्ट्र कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी सांगितले.

परळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आज दिनांक ५ रोजी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष माधव बावगे यांना नुकताच बाबा आमटे राष्ट्रीय समाजसेवा पुरस्कार मिळाला.त्याबददल परळी शाखेच्या वतीने त्यांचा व प्रथमच परळी दौऱ्यावर आलेले राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्याध्यक्ष माधव बावगे, राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, सुधाकर तट,राज्य सहकार्यवाह (व्यसन प्रबोधन व संघर्ष) महाराष्ट्र अंनिस,सूर्यकांत तेलंग,कार्याध्यक्ष,अंबाजोगाई ,महाराष्ट्र अंनिस,बालाजी राऊत,जिल्हा प्रधान सचिव,धाराशिव,महाराष्ट्र अंनिस आदी मान्यवर उपस्थित होते.


यावेळी माधव बावगे व संजय बनसोडे यांनी उपस्थित अंनिस पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले.आगामी कार्यक्रमांची माहिती दिली.याप्रसंगी रानब गायकवाड,प्रा. विलास रोडे, सुकेशनी नाईकवाडे, नवनाथ दाने, विकास वाघमारे, अशोक मुंडे, अनंत इंगळे, संजीब रॉय, संजय खाकरे, जी.एस. सौदळे, बालाजी ढगे, विठ्ठलराव झिलमेवाड, भानुदास उफडे,रतन उजगरे, सुरेश जाधव, अभिमन्यू घोबाळे, राहुल सूर्यवंशी, महादेव आजले, भिमराव गोदाम, प्रकाशसिंग तुसाम यांच्या सह अदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी-३ एम.आय.डी.सी.बीड-४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF WEEKLY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)

# तिहेरी हत्याकांडातील ६ आरोपींना 3 दिवसांची कोठडी

## पोलिस पथकांकडून फरार आरोपींचा शोध सुरू

नांदेड : प्रतिनिधी

डी मार्ट तथा ई-स्केअर परिसरात शुक्रवारी मध्यरात्री गँगवार झाले. या गँगवॉरमध्ये तीन जणांनी हत्या करण्यात आली. या प्रकरणातील ६ आरोपींना आत्तापर्यंत पोलिसांनी अटक केली. त्यांना रविवार दि. ५ एप्रिल रोजी न्यायालयासमोर उभे केले असता ८ एप्रिलपर्यंत म्हणजे ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर पोलिसांच्या विविध पथकांकडून दोन्ही गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे.नांदेड शहरात डी मार्ट तथा ई-स्केअर परिसरात शुक्रवारी मध्यरात्री २ गँगमध्ये तलवार, खंजिर आणि इतर धारधार शस्त्रांनी तुफान राडा होऊन ३ जणांची हत्या झाली. यात एकाची चक्क शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तेथेच हत्या करण्यात आली. यामुळे नांदेड जिल्हा हादरून गेला. या गंभीर प्रकाराची दखल घेऊन जिल्हा पोलिस प्रशासनाने तात्काळ तपास यंत्रणा राबवली. तत्पुर्वी दापथकांनी आरोपी नागेश उत्तमराव लडे, संभाजी अनंतराव क्षीरसागर, प्रदीप गजानन चव्हाण, गजानन वालसिंग चव्हाण, सोनू राऊत, शाकेरखान अशा दोन्ही टोळ्यातील ६ आरोपींना जेरबंद केले होते. या आरोपींना ५ एप्रिल रोजी सन्माननीय न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान या तिहेरी खून प्रकरणाच्या तपासासाठी आणि फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी ग्रामीण पोलिसांचे १ पथक, स्थानिक गुन्हे शाखेचे २ पथक, भाग्यनगर पोलीस ठाण्याचे २ पथक नियुक्त करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.परस्पर विरोधी गुन्हे दाखलगॅंगवॉरमधून झालेल्या या तिहेरी हत्याकांड प्रकरणी दोन्ही बाजून परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात मयत अर्जितसिंघ चव्हाण गटाकडून अनिता गजानन चव्हाण यांच्या फिर्यादीवरून ५ मुख्य आरोपीसह इतरांवर भाग्यनगर ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तर दुस-या गटातील मयत सयद आवेज सयद खलील व महमद अरबाज महमद फारूख रा. इदगाह मैदान यांच्यावतीने सयद खलील सयद इब्राहीम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ५ मुख्य आरोपींसह इतरांवर गुन्हा दाखल झाला आहे.



# केज येथे तीन सेवानिवृत्त शिक्षकांचा गौरव व निरोप समारंभ संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.०४ एप्रिल रोजी केज तालुक्यातील केज केंद्रातील तीन शिक्षकांचा एकाच वेळी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांना निरोप समारंभ देण्यात आला. आश्रुबा सोनवणे,हनुमंत अंजान व दिगंबर गिरी हे शिक्षक एकाच वेळी सेवानिवृत्त झाल्यामुळे केज येथील विठाई मंगल कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत तिन्ही सेवा निवृत्त उत्सवमूर्तींना निरोप समारंभ देण्यात आला.आश्रुबा सोनवणे हे अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात असत.त्यांनी गटसाधन केंद्र केज,येथे साधन व्यक्ती म्हणून,लव्हूरी केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख म्हणून,केजकेंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक म्हणून तसेच अनेक प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पाडल्याने कार्यालयाच्या वतीने वरील तिन्ही उत्सवमूर्तींना एकाच वेळी सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे हे होते.प्रमुख पाहुणे म्हणूनखा.बजरंग बप्पा सोनवणे,श्रीमती सारिका बजरंग सोनवणे,भाई मोहन गुड,दत्तात्रय चाटे इत्यादी मान्यवर व शिक्षक आणि पाहुणे तसेच मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविकपर भाषणात आश्रुबा सोनवणे म्हणाले आम्ही गरीबांच्या लेकरांना प्रामाणिकपणे शिकविले शैक्षणिक काम केले म्हणूनच आमची लेकरे चांगल्या पद्धावर नोकरी साठी गेले.सर्वकाही प्राप्त केले आता फक्त समाजकार्य करण्यासाठी आयुष्य घालवायचे असे त्यांनी यावेळी सांगितले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त

# केजमध्ये सामाजिक व प्रबोधन पर्वाचे आयोजन; भव्य रक्तदान शिबीर, व्याख्यान आणि प्रबोधन कार्यक्रमांची रेलचेल

केज/प्रतिनिधी

केज येथील उप जिल्हा रुग्णालय आणि पंचायत समिती मैदान परिसरात आगामी काळात विविध सामाजिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भव्य रक्तदान शिबीर,फळवाटप, व्याख्यान आणि प्रबोधन पर कार्यक्रमांचा समावेश असून,केज तालुक्यातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजक दिपक भाऊ कांबळे युवा मंच यांच्या वतीने करण्यात आले आहे.शुक्रवार,१० एप्रिल रोजी भव्य रक्तदान शिबीर व फळवाटप

कार्यक्रमाची सुरुवात १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०-०० वाजता उप जिल्हा रुग्णालय, केज येथे होईल.या दिवशी भव्य रक्तदान शिबीर व रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आहे.या उपक्रमाचे उद्घाटन डॉ.दत्तात्रय केंद्रे अधीक्षक,उप जिल्हा रुग्णालय केज आणि श्री.संदीप मांजरमे सहाय्यक पोलिस उप निरीक्षक,केज पोलीस स्टेशन यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

बुधवार,१५ एप्रिल रोजी प्रा.नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान

१५ एप्रिल रोजी बुधवारी सायंकाळी ५-०० वाजता पंचायत समिती मैदान, केज येथे प्रसिद्ध व्याख्याते प्रा.नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी उद्घाटक श्री.विष्णू भाऊ घुले मा. सभापती,पंचायत समिती केज,अध्यक्षपदी श्री.दिपक भाऊ कांबळे तालुकाध्यक्ष,रि.पा.इ.हे असणार आहेत.यावेळी केजतालुक्यातील विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

गुरुवार १६ एप्रिल रोजी भीमशाहीर आयु.राहुल जी अन्वीकर यांचा प्रबोधन कार्यक्रम संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी १६ एप्रिल रोजी सायंकाळी ५-०० वाजता पंचायत समिती मैदान येथे राष्ट्रीय प्रबोधनकार भीमशाहीर आयु.राहुल जी अन्वीकर यांचा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न होईल.या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून आयु.पप्पूजी कागदे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष, रि.पा.इं आठवले गट हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.विष्णू भाऊ घुले हे असणार आहेत.यासर्व कार्यक्रमासाठी जिल्हा भरातून भीम सैनिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी असणार आहे. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वीते साठी आयोजन समिती सह तालुक्यातील अनेक प्रतिष्ठीत नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या कार्यक्रमांना केज व परिसरातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




# धांडेनगर मधील विकास कामाची आ. विजयसिंह पंडित यांनी केली पाहणी

## उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल, शेख मुजीब यांची उपस्थिती

बीड (प्रतिनिधी)

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीडचे तत्कालीन पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांनी बीड शहराच्या सर्वांगिन विकासाचे जे स्वप्न पाहिले होते ते राज्याच्या विद्यमान उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री ना.श्रीमती सुनेत्रावहिणी अजित पवार यांच्या माध्यमातून नक्कीच पूर्ण करण्यात येईल. नागरीकांच्या मुलभूत सुविधा आणि शहराच्या सर्वांगिन विकासासाठी आपण कटिबध्द असून नागरीकांना यापुढील काळात विविध सुविधा निर्माण करून दिल्या जातील. शहरातील विकासकामे दर्जेदार होतील, आपले शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी नागरीकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. बीड शहरातील धांडे नगर भागातील मुख्य नाला आणि रस्त्याच्या कामाची पाहणी त्यांनी केली यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्याला त्यांनी विद्युत पोल काढायला लावले तसेच संबंधितांना कामाला गती देण्याचे आदेश दिले. यावेळी त्यांनी उपस्थित नागरीकांशी संवाद साधला.




बीड शहरातील धांडे नगर येथील मुख्य नाला आणि रस्त्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला होता. नगर पालिकेच्यावतीने धांडेनगर मधील नाला आणि रस्त्याचे काम सुरु असून या कामाची पाहणी आ. विजयसिंह पंडित यांनी केली. यावेळी नाल्याच्या आणि रस्त्यांच्या मधोमध झाडे आणि महावितरणचे विद्युत पोल उभे असल्याची गंभीर बाब आ. पंडित यांच्या निदर्शनास आली, त्याची तात्काळ दखल घेऊन त्यांनी महावितरण अधिकाऱ्यांशी संपर्क करून सदर पोल हटविण्याचे आदेश दिले त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि कंत्राटदार यांना नाला व रस्त्याचे उर्वरित काम तात्काळ सुरु करून पूर्ण करण्याचे निर्देश दिले. नाला व रस्ता यामधील पॅचवर्कचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी यावेळी उपस्थितांना दिल्या.

यावेळी उपस्थित नागरीकांशी संवाद साधताना आ. पंडित म्हणाले की, स्व.अजितदादा पवार यांनी बीडच्या सर्वांगिन विकासाचे स्वप्न पाहिले होते ते पूर्ण करण्यासाठी बीड नगर परिषदेचे सर्व पदाधिकारी मेहनत घेत आहेत. यापुढील काळात शहरातील नागरीकांच्या मुलभूत समस्या पूर्ण केल्या जातील. राज्याच्या विद्यमान उपमुख्यमंत्री ना.श्रीमती सुनेत्रावहिणी अजित पवार यांच्या माध्यमातून बीड शहरासाठी मोठा निधी आणून विकास कामे केले जातील. आपले शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी नागरीकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या भेटी दरम्यान धांडेनगर भागातील नागरीक आणि मनसेच्या वतीने आ.विजयसिंह पंडित यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मागण्यांचा सकारात्मकरितीने पाठपुरावा केला जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्षा प्रतिनिधी शेख मुजीब, गटनेते फारुक पटेल, नगरसेवक अशफाक इनामदार, महेश धांडे, झुंजार धांडे, अमोल कुमकर, संतोष नेवाळे, सागर शिंदे, संदिपान आदमाने, डॉ.सुरेश मुंडे, नितीन धांडे, अंकुश आगळे, दिपक पिंगळे, किशोर राऊत, हरिश धांडे, सर्जेराव राऊत, बाळू नाईक यांच्यासह या भागातील नागरीक उपस्थित होते.

# जुन्या वादातून आनेगाव येथे दाम्पत्यावर जीवघेणा हल्ला

## सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी

जुन्या वादाचे पर्यावसान हाणामारीत होऊन एका दाम्पत्याला लाठ्या काठ्या,केबलची वायर आणि दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना केज तालुक्यातील आनेगाव शिवारात घडली आहे.याप्रकरणी युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात सहा जणां विरुद्ध विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहिती नुसार,फिर्यादी विजयकुमार उत्तमराव कुलकर्णी वय ५९,रा. आनेगाव हे दि.३ एप्रिल रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास शेतात पाणी देण्यासाठी आपल्या दुचाकीवरून जात होते.यावेळी पांढरी नावाच्या शिवारात आरोपींनी त्यांची दुचाकी अडवली.तुम्ही आमच्या विरुद्ध तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला का गेलात? असा जाब विचारत आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.



हा वाद विकोपाला गेल्यावर आरोपींनी विजयकुमार कुलकर्णी आणि त्यांची पत्नी सीमा यांना लाथाबुक्क्यांनी, हातातील केबलच्या वायरने आणि दगडाने मारहाण केली.यामध्ये कुलकर्णी यांच्या डोक्याला आणि हातापायाला गंभीर जखमा झाल्या आहेत, तर त्यांच्या पत्नीलाही जखमी करण्यात आले. मारहाण केल्यानंतर आरोपींनी त्यांना जिवे मारण्याची धमकी देऊन तेथून पळ काढला. जखमींवर सध्या अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## तीन दिवसांपासून बेपत्ता विवाहितेचा

# मृतदेह विहिरीत आढळला

धारूर ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून, तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या विवाहित तरुणीचा मृतदेह गावातील विहिरीत आढळून आला आहे. अमृता लक्ष्मण डोईफोडे (वय १७) असे मृत तरुणीचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अमृता ही गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता होती. तिचा शोध सुरू असतानाच रविवारी (दि. ५) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास कासारी गावातील अभिमन्यू डोईफोडे यांच्या विहिरीत तिचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच धारूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला असून, पुढील तपासासाठी तो धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे.अमृताचा विवाह एक वर्षांपूर्वी वडवणी तालुक्यातील एका खेड्यातील तरुणासोबत झाला होता. सुरुवातीचे सहा महिने सासरी तिचा व्यवस्थित संसार सुरू होता. मात्र त्यानंतर काही कारणास्तव ती मागील सहा महिन्यांपासून माहेरीच राहत होती. या दरम्यान अचानक ती तीन दिवसांपूर्वी घरातून बेपत्ता झाली होती. याबाबत तिचे वडील लक्ष्मण डोईफोडे यांनी धारूर पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती.दरम्यान, मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. आत्महत्या की घातपात, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नसून, उत्तरीय अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येणार आहे. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढिल तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक बाबासाहेब भवर करित आहेत .

# जामखेडमध्ये व्यापाऱ्यांची मुजोरी शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशावर काटा

## शेतकऱ्यांनो आता तरी जागे व्हा ४० क्विंटल कापूस भरतो फक्त ३२ क्विंटल व्यापाऱ्यांच्या लुटीचा पंकज मंडलिक यांनी केला पर्दाफाश

जामखेड ।प्रतिनिधी

रात्रंदिवस राबून लेकराप्रमाणे पीक जपणारा बळीराजा आज निसर्ग आणि सरकारच्या दुहेरी संकटात सापडला असतानाच जामखेडमध्ये आता व्यापाऱ्यांनी आपली काळी नजर शेतकऱ्यांच्या खिशावर टाकली आहे. सोमवारी दि. ३० रोजी जामखेड परिसरात व्यापाऱ्यांच्या लुटीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला असून यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ माजली आहे.लुटीचा नवा पॅटर्न क्विंटलमागे १०-१५ किलोचा काटा गेल्या महिनाभरापासून जामखेड परिसरात व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची उघड लूट सुरू असल्याची ओरड होत होती.पण सोमवारी जागरूक शेतकऱ्यांनी हा डाव उधळून लावला. प्रत्यक्ष वजन ४० क्विंटल असताना काट्यावर मात्र ते अवघे ३२ ते ३५ क्विंटल दाखवून शेतकऱ्यांच्या हक्काचे हजारो रुपये हडप केले जात आहेत.शेतकऱ्याचा कापूस की व्यापाऱ्यांची चांदी ? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.पोलीस आले पण तक्रारदार कुठे ?

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. कारवाईसाठी पोलीस सज्ज होते मात्र दुर्दैवाने एकही शेतकरी लेखी तक्रार देण्यासाठी पुढे आला नाही. शेतकऱ्यांच्या याच गप्प राहण्याच्या वृत्तीचा फायदा हे दलाल आणि व्यापारी घेत आहेत.आपणच तक्रार द्यायला घाबरलो तर पोलीस कारवाई करणार कशी ? आपली एकजूट नसल्यानेच व्यापाऱ्यांचे फावते आहे.आता सहन करण्याची वेळ गेली आता लढण्याची वेळ आली आहे पंकज मंडलिक यांचे जाहीर आवाहन

या अन्यायाविरोधात आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांनी सर्व शेतकरी बांधवांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की एकजूट ठेवा व्यापाऱ्यांच्या दबावाला बळी पडू नका.अन्याय सहन करू नका जर काटा मारला जात असेल तर जाब विचारा.तक्रार करण्यास घाबरू नका पोलीस प्रशासन मदतीला तयार आहे फक्त धाडस दाखवा.

ज्यांचे पैसे अडकलेत त्यांनी संपर्क साधा ज्या शेतकरी बांधवांची फसवणूक झाली आहे किंवा ज्यांचे पैसे व्यापाऱ्यांकडे अडकले आहेत त्यांनी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले



आहे.पोलीस प्रशासनाच्या मदतीने या लुटारू व्यापाऱ्यांवर कायदेशीर बडगा उगारला जाईल असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.शेतकरी जागा झाला तरच ही लूट थांबेलजय जवान जय किसान



# विक्रमशिला गुरुकुलात वार्षिक पालक भेट व गुणवंत विद्यार्थ्यांचा

## दिमाखदार गुणगौरव सोहळा संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

दि.३ एप्रिल रोजी शहरातील विक्रमशिला गुरुकुलात वार्षिक पालक भेट कार्यक्रम उत्साहात पार पडला. या सोहळ्याला विद्यार्थी पालक मा.श्री राधाकिशन तवार अध्यक्षस्थानी होते तर गुरुकुलचे संचालक मा.श्री संजय जाधव सर प्रमुख उपस्थित होते.या कार्यक्रमात नुकत्याच घेण्यात आलेल्या वार्षिक शब्दसाठा स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, शाल,पुष्पगुच्छ व रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.लहान गट इयत्ता ४ थी ते ५ वीप्रथम क्रमांक ऋषिकेश जगताप इयत्ता ५ वी २०००/- रुपये रोख ट्रॉफी,द्वितीय क्रमांक आरूष पठाडे इयत्ता ४ थी ८००/- रुपये रोख ट्रॉफी विशेष प्राविण्य प्रशांत वाघ इयत्ता ५ वीउत्तेजनार्थ विराट तवार इयत्ता ४ थी मोठा गट इयत्ता ६ वी ते ८ वी प्रथम क्रमांक वेदांत वाघ इयत्ता ८ वी २०००/- रुपये रोख ट्रॉफी द्वितीय क्रमांक विश्वास पोटे इयत्ता ६ वी १५००/- रुपये रोख ट्रॉफीविशेष प्राविण्य आकाश गायकवाड इयत्ता ८ वी, संभाजी राजगुडे इयत्ता ७ वी उत्तेजनार्थ सोहम भुकेले इयत्ता ८ वी कार्यक्रमात संस्थेचे संचालक व शिक्षकवृंदांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले आणि गुरुकुलाच्या कार्याची प्रशंसा केली.या प्रसंगी संजय जाधव सर, प्रमोद मस्के सर, योगेश हरणे सर, सोपान गाडगे सर, सौ. शितल जाधव मॅडम, सौ. योगिता शिंदे मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# शेवगांवचे पोलीस अंमलदार शाम गुंजाळ पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे हस्ते सन्मानित

अहिल्यानगर पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा ,'पोलीस शौर्य सन्मान २०२६ ,

शेवगांव(प्रतिनिधी):- कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि समाजसेवेचा वसा जपणाऱ्या पोलिसांच्या सन्मानासाठी आयोजित '९२.७ बिग एफ एम पोलीस शौर्य सन्मान २०२६' या सोहळ्यात अहिल्यानगर पोलीस दलाचा दबदबा पाहायला मिळाला. यामध्ये शेवगांव पोलीस ठाण्यातील कर्तव्यदक्ष पोलीस अंमलदार शाम गुंजाळ यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या शुभहस्ते'पोलीस शौर्य सन्मान' देऊन गौरविण्यात आले.




समाजाच्या सुरक्षेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शाम गुंजाळ यांनी वेळोवेळी दाखवलेले शौर्य आणि समर्पण वृत्तीची दखल या पुरस्काराद्वारे घेण्यात आली आहे. एका दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शाम गुंजाळ यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे शेवगांव पोलीस ठाणे आणि संपूर्ण अहिल्यानगर पोलीस दलाची मान अभिमानाने उंचावली आहे. जनतेच्या सेवेसाठी रात्रंदिवस तत्पर असणाऱ्या एका सच्च्या पोलीस कर्मचाऱ्याचा हा गौरव असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

हा सन्मान केवळ माझा नसून, माझ्या संपूर्ण टीमचा आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाचा विजय आहे. या पुरस्कारामुळे समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढली असून, भविष्यातही अधिक जोमाने जनसेवेसाठी कार्यरत राहीन.

- शाम गुंजाळ, पोलीस अंमलदार (शेवगांव)

या यशाबद्दल शाम गुंजाळ यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्याच्या सुरक्षिततेसाठी अहिल्यानगर पोलीस सदैव कटिबद्ध असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे

# लिंबागणेश पाणीपुरवठा विहिरीच्या मोटारची वायर दीड महिन्यात २ वेळा चोरी

## नेकनुर पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान ! पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल

लिंबागणेश : बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात ग्रामपंचायतीमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर गेल्या दीड महिन्यात तब्बल दोन वेळा चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या योजनेवर परिणाम होत असून पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या वारंवार होणाऱ्या चोरीमुळे ग्रामपंचायतीवर मोठा आर्थिक बोजा पडत असून आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सरपंच बालासाहेब जाधव यांनी दिली. यापूर्वी झालेल्या चोरीबाबत नेकनुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, पुन्हा चोरी झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, आज (दि.०४) नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक



आप्पासाहेब रोकडे व लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी भायाळा साठवण तलाव परिसरातील चोरीच्या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, विनायक वाणी, शिवाजी वाणी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी सुखदेव वाणी उपस्थित होते.

डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, भायाळा साठवण तलावातून लिंबागणेश व पोखरी गावांना पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत सार्वजनिक विहिरीच्या मोटारींच्या वायरची वारंवार चोरी होणे हे गंभीर असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच आव्हान दिले आहे. यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# परळगव्हाण येथे ऊस विकास परिसंवादास प्रतिसाद

एफएमसी व ट्वेंटीवन शुगर्सच्या तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

परभणी : राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील परळगव्हाण येथे ऊस उत्पादक शेतक-यांसाठी विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. एफएमसी आणि ट्वेंटीवन शुगर्स, सायखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रगतिशील शेतकरी भास्करराव शिंदे यांच्या शेतावर पार पडलेल्या या कार्यक्रमात ऊस पिकाचे एकात्मिक कीड, रोग व अन्नद्रव्य व्यवस्थापनावर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रशांत हेगडे, रत्नाकर रेड्डी, गोपीनाथ सोगी, मदन मोहन, चंद्रशेखर आणि शरद बाबरे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.सद्यस्थितीत पूर्व हंगामी, सुरू हंगाम लागवड व खोडवा ऊस पिकाचे व्यवस्थापन करण्याबाबत



माहिती देताना एफएमसीचे प्रतिनिधी प्रशांत बोराडे यांनी कंपनीचा इतिहास आणि विविध उत्पादनांची माहिती दिली. प्रफुल भुयार व सचिन मुंडे यांनी फवारणी करताना विषबाधा होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी सांगून खोडकिडीच्या व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक दाखवले. ट्वेंटीवन शुगर्सचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी ऊस पिकामधील चाबुक काणी व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त ऊसाचे बेट मुळासकट उपटून ते प्लास्टिकच्या पिशवीत घेऊन सुरक्षितपणे नष्ट करावे, जेणेकरून बुरशीचे बीजाणू इतर पिकावर पसरणार नाहीत

## भोंदूबाबा अशोक खरातला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करणार

मुंबई : नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांनी देशभरात खळबळ उडवून दिली आहे. खरातच्या संपर्कात असलेल्या दिग्गज नेत्यांची आणि अधिकाऱ्यांची नावे 'सीडीआर'मधून समोर येत असतानाच, आता राज्य सरकारने या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर पवित्रा घेतला आहे. अशोक खरातला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांची केवळ बदली केली जाणार नाही, तर त्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्यात येईल, असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. काही महसूल आणि पोलीस विभागातील अधिकाऱ्यांनी खरातला जमिनी हडपण्यासाठी किंवा अनैतिक कृत्य लपवण्यासाठी मदत केल्याचा संशय व्यक्त होत आहे. यावर भाष्य करताना बावनकुळे म्हणाले की, हे प्रकरण महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळिमा फासणारे आहे. एसआयटी या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. तपासादरम्यान ज्या अधिकाऱ्यांची नावे समोर येतील, मग ते कोणत्याही खात्यातील असोत, त्यांना नोकरीवर ठेवले जाणार नाही. बदली करून त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, तर त्यांना थेट बडतर्फ केले जाईल. या प्रकरणातील दोषींना सोडले जाणार नाही,

# सुनेत्रा पवारांना मोठा धक्का? १५-२० आमदार शरद पवारांच्या संपर्कात

राज्यातील राजकारणातील एक मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादीतल्या अंतर्गत संघर्षानंतर अजितदादा गटामध्ये मोठी खळबळ माजली आहे. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाला अजितदादा गटातील बड्या नेत्यांनी जाहीरपणे विरोध केला आहे.

मात्र, असं असतानाच अजितदादा गटाच्या एका मंत्र्यानं शरद पवार यांची भेट घेऊन दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर चर्चा केल्याची माहिती आहे. तसेच अजितदादांच्या पक्षाच्या १५ ते २० आमदारांनीही शरद पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात येत्या काळात मोठी राजकीय समीकरणे बदलण्याचे संकेत मिळत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत संघर्ष आता अधिक गंभीर रूप धारण करत असल्याचे दिसून येत आहे. अजित



पवार गटातील आमदारांमध्ये मोठी चलबिचल सुरू असून,१५ ते २० आमदारांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा भूकंप होण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या मते, पक्षातील सतत होणारे वाद आणि अंतर्गत कलहामुळे अनेक आमदार अस्वस्थ झाले आहेत. भविष्यात आपले राजकीय भवितव्य काय असेल, याची चिंता अनेकांना सतावत आहे. मतदारसंघात पक्षांतर्गत वादावादीमुळे आपला जनसंपर्क आणि प्रभाव कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य,शौर्य, पराक्रम व परधर्म सहिष्णुता समाजाचे प्रेरणास्त्रोत आहे - आनंद भैय्या गायकवाड

केज/ प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य,शौर्य, पराक्रम व परधर्म सहिष्णुता समाजाचे प्रेरणास्त्रोत आहे असे प्रतिपादन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.ते दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड आयोजित छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी निमित्त व्याख्यान देताना बोलत होते.छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी निमित्त व्याख्यान, भाषण स्पर्धा,गीतगायन स्पर्धा इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक



अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

आनंद भैय्या गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.तर भाषण स्पर्धेत प्रथम - नंदिता नरेंद्र गायकवाड, द्वितीय - वेदिका डिगांबर गायकवाड,तृतीय -नम्रता नरेंद्र गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले.गीत गायन स्पर्धेत प्रथम - वेदिका दिगांबर गायकवाड,द्वितीय - नम्रता नरेंद्र गायकवाड, तृतीय - अजिंक्य कृष्णा तट यांनी प्राविण्य मिळविले.विजयी स्पर्धकांना ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानीत करणात आले.भाषण स्पर्धेत ९ व गीतगायन स्पर्धेत ही ९ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड,दादासाहेब गायकवाड,नारायण भाऊ गायकवाड,ए.बी. गायकवाड यांची उपस्थिती होती.एकपात्री नाटकाचे प्रयोगही विद्यार्थ्यांनी केले. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, वाचक उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर केज पोलीस ठाण्यात

## शांतता समितीची बैठक संपन्न,डीजे वाजविण्या वर पुर्णपणे बंदी

केज/प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पार्श्वभूमी वर केज पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.या बैठकीमध्ये जयंती उत्सव शांततेत, उत्साहात आणि नियमांच्या चौकटीत राहून साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.सहाय्यक पोलीस अधीक्षक



व्यंकटराम यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे अनिवार्य आहे.त्यामुळे मिरवणुकीत डीजे आणि कर्णकर्कश आवाजावर पूर्णपणे बंदी असेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे संकेत सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम आणि पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी यावेळी दिले.याप्रसंगी

स्वच्छता आणि सोयी सुविधांचे आश्वासन केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी दिले.

# दैनिक समर्थ गांवकरी चे नांदेड जिल्हा प्रतिनिधी अनिल पाटील धमने यांना उत्कृष्ट टॉप टेन पत्रकारीता पुरस्काराने सन्मानित

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या ठिकाणी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान तसेच महाराष्ट्रातील उत्कृष्ट टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा दि ४ एप्रिल रोजी आत्मा मलिक ध्यानपीठ कोकमठाण ता कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथे दै समर्थ गांवकरी चे नांदेड जिल्हा प्रतिनीधी अनिल पाटील धमने यांनी गेल्या १५ वर्षा पासून पत्रकारीता क्षेत्रात उलेखनिय कार्य करीत रोक ठोक लिखान करून अनेक विषयास वाचा फेडून अनेक सर्व सामान्य नागरिकांचे व रोजगार मजुरदार यांचे अनेक प्रश्न शासन दरबारी आपल्या बातमी च्या माध्यमातुन मांडून ते प्रश्न सोडवीत असतात दैनिकाच्या माध्यमांतुन सामाजीक राजकीय क्षेत्रात अपला वेगळा ठसा उमटविला असुन ते अनेकांना आपल्या बातमी मधून न्याय देण्याचे काम करीत आहेत त्यामुळे दैनिक गांवकरी समुहाच्या वतीने अनिल पाटील धमने यांना पत्रकारीता क्षेत्रातील उत्कृष्ट टॉप टेन २०२६ पुरस्कार सन्मान पत्र व सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ पेन व मोठी घड्याळ देऊन दै समर्थ गांवकरी चे मुख्य संपादक डॉ विश्वासराव आरोटे . बिग बॉस फेम च्या दिव्या शिंदे . कार्यकारी संपादक नवनाथ जाधव . नवी मुंबई संपादक दशरथ चव्हाण . संजय


फुलसुंदर . यांच्या सह मान्यवरांच्या उपस्थिती देण्यात आले . हा कार्यक्रम दि ४ एप्रिल २०२६ रोजी आत्मा मलिक ध्यानपीठ, समृद्धी महामार्ग शेजारी, कोकमठाण (ता. कोपरगाव) जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडला आहे यावेळी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार-२०२६ संत परमानंद महाराज (आत्मा मलिक ध्यानपीठ, कोकमठाण)




यांना प्रदान करण्यात आला आहे. तर उत्कृष्ट पत्रकारीता क्षेत्रातील महत्वाचे मानले जाणारे टॅप टेन २०२६ हा पुरस्कार दै समर्थ गांवकरी चे जिल्हा प्रतिनिधी अनिल पाटील धमने यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना देण्यात आला या कार्यक्रमास महाराष्ट्रतुन सर्व जिल्ह्यातील समर्थ गांवकरी समुहाचे संपादक, उपसंपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहरांचा सन्मान, व विविध साहित्य वितरण तसेच मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून बिग बॉस फेम चे दिव्या शिंदे (सरकार सेना संघटना अध्यक्ष व प्रसिद्ध इंस्टाग्राम मुख्य संपादक डॉ विश्वासराव आरोटे पाटील इन्फ्लुएंसर), डॉ. नवनाथ जाधव (कार्यकारी संपादक), दशरथ फुलसंघ (संपादक व नवी मुंबई जिल्हा व्यवस्था, म.टा.प., मुंबई तसेच संजयसुंदर, दै. समर्थ गांवकरी) यांची प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला असून यावेळी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले आहे बिग बॉस फेम दिव्या शिंदे यांना राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्कार २०२६, संतोष देविदास कोकणे यांना समाजसेवा पुरस्कार २०२६, मा. वर्षाताई चौधरी (लहित, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांना उद्योजिका पुरस्कार २०२६ तसेच मा. सुनिलशेठ डांगरा (अकोले, जि. अहिल्यानगर) यांना उद्योजक पुरस्कार - २०२६ प्रदान करण्यात येणार आहेत.

याशिवाय टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार अंतर्गत चंद्रकांत कोळी (रावेर, जि. जळगाव), रविंद्र भोर (जुन्नर, जि. पुणे), मा. दत्तात्रय राऊत (जामखेड, जि. अहिल्यानगर), मा. राजेश डोके (शिवनेरी, ता. जुन्नर), मा. रविंद्र आहेर (कळवण, जि. नाशिक), फयाक अली सय्यद (खर्डा, ता. जामखेड), मा. दशरथ चव्हाण (नवी मुंबई), संतोष पडवळ (ठाणे), , मा. सुभाष विशे (शहापूर, जि. ठाणे) आणि पत्रकार राजू टपाल यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या मेळाव्यास संपादक, प्रतिनिधी, वार्ताहर तसेच नांदेड जिल्ह्यातील नायगाव प्रतिनिधी चंद्रकांत सुर्यतळे .

मुदखेड प्रतिनिधी नामदेव राहीरे . मुखेड प्रतिनिधी बाबुराव वाघमारे यांच्या सह विशेष प्रमुख पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थितीत होती हा कार्यक्रम मोठ्या आनंदोत्सवात साजरा झाल्याचे दिसुन आले असून या पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे अनिल पाटील धमने यांचे पत्रकारीता . सामाजिक राजकिय क्षेत्रातील मित्र मंडळीनी शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे '



# हिब्बटच्या शेतक-याची कन्या पूजा मुंडे झाली पोलिस

आण्णाभाऊ साठे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य-प्राध्यापकांनी केला सत्कार

मुखेड / प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे हिब्बट येथील शेतकरी रोहिदास मुंडे यांची कन्या पूजा मुंडे हीने नुकतच घेण्यात आलेल्या पोलिस भरती प्रक्रियेत अथक परिश्रमाच्या जोरावर नेत्रदीपक यश संपादन करीत अकोला पोलिस दलात सलेक्ट झाली आहे.शेतक-याच्या कन्येने पोलिस होण्याचे बहुमान प्राप्त केल्यामुळे तिचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनिची पोलिस दलात निवड झाल्याबद्दल शाहीर आण्णाभाऊ साठे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य,प्राध्यापकांनी सत्कार करुन अभिनंदन केले.

तालुक्यातील मौजे हिब्बट येथील शेतकरी रोहिदास मुंडे यांनी आपल्याकडील असलेल्या शेतीच्या उत्पन्नावरच संपूर्ण कुंटुबाचा उदरनिर्वाह चालवितात व लेकरांना शिक्षणासाठी मदत करतात.पूजा मुंडे ही लहाणपणासुनच शिक्षणात हुशार असल्यामुळे ति हळूहळू जिद्द,चिकाटी आणी अभ्यासाच्या जोरावर यशाच्या समीप पोहचत गेली.आई-वडील शेतकरी असल्यामुळे त्यांच्या कष्टाची व परिश्रमाची तिला जाणीव होती म्हणूनच पुजाने शिक्षणामध्ये अथक परिश्रम घेत नुकत्याच झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेत सहभाग घेत मेहनतीच्या जोरावर पोलिस होण्याचे स्वप्न पूर्ण केले.तिची अकोला पोलीस दलात निवड झाली.तिच्या या यशाबद्दल शाहीर अण्णाभाऊ साठे ज्यूनियर कॉलेजचे प्राचार्य वडले.बी.जी,उपप्राचार्य केरूरे एस.डी,प्राध्यापक डॉ.नागरगोजे एन.डी,प्राध्यापक शिंदे.एन.जी, प्राध्यापक स्वामी.बी.व्ही, प्राध्यापक सककूरे.ए.एच, प्राध्यापक डांगे यूवराज, प्राध्यापक चौधरी डी.व्ही, जयवंत नागरगोजे यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.अकोला पोलीस दलात नोवड झालेल्या पूजा मुंडे हिचे पहिला ते सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिब्बट येथे झाले तर आठवी ते दहावीपर्यंतचे माध्यमिक शिक्षण अशोक विद्यालय एकलारा येथे झाले तसेच अकरावी ते बारावी पर्यंतचे उच्चशिक्षण शाहीर आण्णाभाऊ साठे महाविद्यालय मुखेड येथे पूर्ण केले.पूजा मुंडे पोलिस झाल्यामुळे मुंडे परिवार व नातेवाइकांमध्ये आंनदाचे वातावरण पसरले आहे.

# किनवटमध्ये महावितरणचा ढिसाळ कारभार; वारंवार वीज खंडित होऊन नागरिक संतप्त, नुकसान भरपाईची मागणी जोरात

किनवट ।प्रतिनिधी

किनवट शहरात सध्या वीज पुरवठ्याचा अक्षरशः खेळखंडोबा सुरू असून महावितरणच्या ढिसाळ व निष्काळजी कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसातून तब्बल १० ते १५ वेळा अचानक वीज खंडित होत असल्याने शहरातील व्यावसायिक, उद्योगधंदे करणारे तसेच संगणकीय व यांत्रिक कामकाजावर अवलंबून असलेले ग्राहक प्रचंड मनस्ताप सहन करत आहेत.

विशेषतः अवजड मशिनरी, वर्कशॉप, मिल, तसेच कॉम्प्युटरवर आधारित सेवा देणाऱ्या व्यवसायांना याचा मोठा फटका बसत आहे. प्रत्येक तासाला वीज पुरवठा खंडित होत असल्याने सुरू असलेले काम मध्येच बंद पडते, यंत्रणांमध्ये बिघाड निर्माण होतो आणि लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. अनेक ठिकाणी वारंवार ट्रिपिंगमुळे मशीन जळण्याच्या घटनाही वाढत असल्याची तक्रार व्यावसायिकांकडून होत आहे.

दरम्यान, महावितरणकडून ग्राहकांकडून वीज बिलाची वसुली मात्र अत्यंत कठोरपणे केली जात आहे. शहरातील बहुतांश वीज मीटर स्मार्ट प्रणालीवर असून ते थेट खांबावर बसवण्यात आले आहेत. एखाद्या ग्राहकाचे केवळ ३०-४० दिवस बिल थकले तरी स्मार्ट मीटरद्वारे तात्काळ वीज पुरवठा खंडित केला जातो. जोपर्यंत बिल भरले जात नाही, तोपर्यंत वीज सुरू होत नाही. अशा कडक वसुलीच्या पार्श्वभूमीवर महावितरणकडूनच वारंवार वीज खंडित होणे हे नागरिकांना संतापजनक व अन्यायकारक वाटत आहे.

आठवड्यातून एक दिवस किंवा नियोजित वेळेत वीज खंडित करणे समजू शकते, मात्र दर तासाला होणारा हा अकार्यक्षम वीज पुरवठा नागरिकांच्या सहनशक्तीचा अंत पाहत आहे. यामुळे शहरात हळूहळू तीव्र असंतोष पसरत असून परिस्थिती कधीही चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.याच पार्श्वभूमीवर काही जागरूक ग्राहकांनी वीज खंडित होण्याच्या घटनांची नोंद, व्हिडिओ व इतर पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई मिळवण्यासाठी ग्राहक मंच व न्यायालयात धाव घेण्याची तयारी सुरू आहे.

वीज बिल वेळेवर भरा, अन्यथा पुरवठा बंद असा कडक नियम लावणाऱ्या महावितरणने स्वतःच्या सेवेची जबाबदारीही तेवढ्याच कडकपणे पार पाडावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्यथा किनवटमध्ये नागरिकांचा रोष उफाळून मोठ्या आंदोलनाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# असर्जन नाका ते वाघाळा रस्ताची बकाल अवस्था तात्काळ दुरुस्ती करा

परिसरातील नागरीकाची मागणी

नांदेड।प्रतिनिधी

मनपा नांदेड हद्दीत असलेल्या असर्जन नाका ते वाघाळा जाणाऱ्या मुख्य रोडवर ड्रेनेज लाईन च्या कामासाठी रस्ता खोदल्यामुळे चांगला रस्ता नादुरुस्त झाल्यामुळे गेल्या वर्षापासून परिसरातील अनेक भागातील नागरीकांचे बेहाल होत असुन तात्काळ रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी मनपा आयुक्त यांच्या कडे परिसरातील नागरिकांनी केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका प्रभाग क्रमांक २० मधील त्रिमूर्ती नगर,विठ्ठल नगर , साईबाबा नगर, श्रीराम नगर येथे जाण्यासाठी रस्त्याची दयनिय अवस्था झाली आहे सदरील परिसरात पोलीस विभागातील कर्मचारी वैद्यकीय सेवा डॉक्टर ,सैन्य दलातील सैनिकाचे कुटुंबीय राहत असून नादुरुस्त रस्ता मुळे नोकरी वरील कर्मचारी, शालेय विद्यार्थी व परिसरातील नागरीकांचे ये जा करण्यासाठी कसरत करावी लागत असतो मनपा प्रशासनाने ड्रेनेज लाईन टाकली मात्र आद्यापही कनेक्शनही देण्यात आले नाही,गेल्या अनेक दिवसांपुर्वी परिसरातील नागरिकांनी स्वखर्चाने नागरीकांनी रस्ता दुरुस्त केला होता परंतू मोठं मोठ्या टिपर हायवा वाहनांची येजा चालू असल्याने पुन्हा रस्ता नादुरुस्त झाला आहे.



गेल्या एक वर्षापासून ड्रेनज लाईन साठी चांगला रस्ता मधोमध खोदून ड्रेनेज लाईन साठी खोदण्यात आला आहे परंतु सदरील रस्त्याची दुरुस्ती न करता जशाच तसाच सोडण्यात आल्यामुळे परिसरातील अनेक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असुन रस्त्यामध्ये वाहने अडकून पडणे, खड्डेमय रस्त्यामुळे टिपर,मोठे मोठे वाहने गेल्याने रस्त्यावर अडकून पडणे यासह अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत असुन या बाबत मनपा आयुक्त व लोकप्रतिनिधी यांना निवेदनाद्वारे कळविण्यात आले असून अद्यापही या कडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

अवकाळी पावसामुळे मात्र नागरीकांचे बेहाल झाले आहेत अनेक वाहने आहे तेथे लावण्यात आली होते, तात्काळ मनपा आयुक्त यांनी या समस्येकडे लक्ष देऊन रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरीकातुन होत आहे.

# ४६ वर्ष समर्पणाची, ४६ वर्ष भाजपची

अटलजी अडवाणीचा भाजपा मोदी शाहनी जगातील एक नंबर चा पक्ष केला

अकोले - भारतीय जनता पक्षाचा म्हणजेच भाजपचा आज ४६ वा स्थापना दिवस आहे. ६ एप्रिल १९८० रोजी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली जनता पक्षातून बाहेर पडलेल्या लोकांनी भाजपची स्थापना केली. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांनी स्थापन केलेल्या भाजपला १९८४ मध्ये केवळ दोन जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर त्यांनी पक्ष वाढवत १९९८ मध्ये १८२ जागांवर भाजपला विजय मिळवून दिला. तीन वेळा अटलजी पंतप्रधान झाले. २०१४ मध्ये २८२ जागा जिंकल्या आणि २०१९ मध्ये जागांची संख्या ३०० च्या पुढे गेली. २०२४ साली पुन्हा भाजपा सरकार नरेंद्र मोदी च्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा स्थापन झाले.

अटलजी अडवाणी चा भाजपा मोदी शाह नी जगातील एक नंबर चा पक्ष केला. भाजपा दोन खासदारा वरून बहुमताने तीन वेळा अटलजी चे सरकार नंतर मोदी शाह जोडीने पूर्ण बहुमताने तिसऱ्यादा सरकार स्थापन करित जगातील सर्वात मोठा पक्ष असे नावारूपास आणला आहे

जनसंघ ते भाजपा

जनसंघाची स्थापना २१ ऑक्टोबर १९५१ रोजी डॉ शामाप्रसाद मुखर्जी यांनी केली होती. भारतामधील हिंदूचे हित जपने ही जनसंघाची उदिष्टे होती. १९५१-५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भारतीय जनसंघाने लोकसभेच्या तीन जागा जिंकल्या, त्यापैकी श्यामा प्रसाद मुखर्जी यांनीही एक जागा जिंकली. स्थापनेनंतर जम्मू आणि काश्मीर संपूर्ण भारतात घेतला जावा अशी भूमिका जनसंघाने घेतली दरम्यान निदर्शने करताना अटक झालेल्या मुखर्जी यांचे काश्मीर च्या तुरुंगात निधन झाले. १९६७ सालच्या देशव्यापी विधानसभा निवडणुकीत जनसंघाने अनेक लहान प्रादेशिक पक्षांसोबत युती केली व मध्य प्रदेश, बिहार व उत्तर प्रदेश राज्यांमध्ये सरकारे स्थापन केली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या देशव्यापी आणीबाणीला जनसंघाने कडाक्याचा विरोध केला व जनसंघाच्या अनेक सदस्यांना तुरुंगात डांबले गेले गेले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. मोराराजी देसाई पंतप्रधान व अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री झाले. परंतु अंतर्गत कलहा ने ग्रासलेले जनता पार्टी सरकार १९८० साली कोसळले व जनता पार्टीचे विघटन झाले. विघटनानंतर भारतीय जनता पार्टी स्थापन केली. अटलबिहारी वाजपेयी पहिले अध्यक्ष झाले.

भाजपा ची तत्वे

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेले 'एकात्मता मानवता वाद ' भाजपने आपले वैचारिक तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारले आहे. याशिवाय अंत्योदय, सुशासन, सांस्कृतिक राष्ट्रवाद, विकास आणि सुरक्षा यावरही पक्षाचा विशेष भर आहे. पक्षाने 'पंचनिष्ठा' नावाच्या पाच मुख्य तत्त्वांवर आपली निष्ठाही व्यक्त केली. ती तत्त्वे म्हणजे राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय अखंडता, लोकशाही होय.

भाजपा स्थापनेनंतर अटलजी व मोदीजी तीन वेळा पंतप्रधान झाले. अटलजींच्या वेळी अनेक पक्षाचे सरकार सांभाळत तारेवरची कसरत करत पोखरण ची अणुबाँब चाचणी केली, पाकिस्तान बरोबर संबंध प्रस्थापित केले. कारागील युद्ध जिंकले. कवी मनाचे अटलजी यांनी अनेक कठोर निर्णय घेतले.

अटलजींनी पाहिलेले स्वप्न मोदींनी पूर्ण केले. पूर्ण बहुमताने सरकार आलेले मोदीजींनी भाजपा ने दिलेले आश्वासन पूर्ण केले. काश्मीर मध्ये एक ही रक्ताचा थेंब ही न सांडता कलम ३७० हटवले, देशात कुठंही दंगल न होता भव्य राममंदिर उभारले. तीन तलाक कायदा रद्द केला. नवीन संसद भवन बांधले, महिला विधेयक मंजूर करून महिलांना संसद व विधानसभेत आरक्षण दिले. वक्फ बोर्ड कायदा सुधारणा विधेयक मंजूर केले.



आता फक्त समान नागरी कायदा राहिला तो झाला की भाजपा ची सर्व आश्वासने पूर्ण झाली.

सामर्थ्यवान भारत सुरक्षित भारत या दृष्टिकोनातून जगाचा विरोध झुगारून पोखरण अणुचाचणी अटलजींनी केली, मोदींनी आधुनिक सुरक्षा व्यवस्था निर्माण केली. शौर्याचा विजय तिरंग्याचा महासन्मान कारगिल विजय अटलजींच्या काळात मिळवला, मोदींनी पाकिस्तान भिकेला लावला.

प्रगतीचा महामार्ग विकसित भारताचा राजमार्ग अनेक महामार्ग बनवले.

सौगंध राम की खाई है मंदिर वही बनायेंगे या घोषणेनुसार भव्य दिव्य राम मंदिर उभारणी केली.

जहाँ हुआ बलिदान मुखर्जी व कश्मीर हमारा है, एक देश दो निशाण, दो प्रधान, दो संविधान नहीं चलेगा या घोषणेनुसार ३७० कलम हटवले.

हे नया भारत है या घुसकर मारते है दहशतवाद हटवला.

नारीशक्ती वंदना अधिनियम लोकसभा व विधानसभेमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण दिले.

हर घर स्वदेशी, घर घर स्वदेशी, होकल फोर लोकल, मेड इन इंडिया या द्वारे स्वदेशीला चालना दिली. डिजिटल इंडिया बनवली. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास निर्माण केला वक्फ बोर्ड सुधारणा कायदा केला.



अमृत भारताची अत्याधुनिक रेल्वे वंदे भारत आधुनिक रेल्वे अमृत रेल्वे स्टेशन याद्वारे रेल्वे मध्ये आमूलाग्र बदल घडला.शक्ती जिद्द विज्ञान चंद्रावर भारताचे यान अटलजींनी चंद्रयान १ची मुहर्तमेढ रोवली मोदींनी चंद्रयान ३ राबवत चंद्राच्या दक्षिण टोकावर जाणारा पहिला देश केला. एक देश एक कर प्रणाली जीएसटी लागू केला. शरणार्थींना सन्मान भारताचा अभिमान दुसऱ्या देशातील हिंदूंना आसरा दिला.

हिंदवी स्वराज्याचा हुंकार छत्रपती शिवरायांचा जयजयकार म्हणत युनिस्कोच्या यादीमध्ये बारा गड किल्ल्यांचा समावेश केला. अभिजात मराठी अभिमान मराठी मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा दिला.

भाजपा हा लोकशाही मानणारा पक्ष असून पक्षांतर्गत निवडणूक प्रक्रिया राबवली जात असून भाजपा ला या नवीन राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कोणालाही माहीत नसणारे ४५ वर्षीय बिहारचे पाच वेळा आमदार असलेले नितीन नबीन यांची निवड झाली. बाकी सर्व पक्ष घराणे शाही चे आहेत. एकमेव भाजपा पक्ष परिवार वादी नाही. बूथ अध्यक्षा पासून राष्ट्रीय अध्यक्षा पर्यंत अतिशय पारदर्शक कारभार राबविला जातो. ऑनलाईन प्राथमिक सदस्य नोंदणीनंतर सक्रिय सदस्य नोंदणी केली जाते. त्यातून मंडल अध्यक्ष निवडला जातो. मंडल अध्यक्षासाठी ४५ वयाची अट घातली असून मंडल विधानसभेचे शंभर बूथ नुसार केले आहे. जिल्हा अध्यक्षासाठी वयाची अट ठेवली असून ५५ वय निश्चित केले आहे.

भाजपा चे आजपर्यंत झालेले राष्ट्रीय अध्यक्ष

१९८० अटलबिहारी वाजपेयी, १९८६ लालकृष्ण अडवाणी, १९९१ मुरली मनोहर जोशी, १९९३ लालकृष्ण अडवाणी १९९८ कुशाभाऊ ठाकरे २००० बंगारु लक्ष्मण, २००१ जन कृष्णामूर्ती, २००२ व्यंकय्या नायडू, २००४ लालकृष्ण अडवाणी , २००६ राजनाथ सिंह, २००९ नितीन गडकरी, २०१३ राजनाथ सिंह २०१७ अमित शाह २०२० जे.पी. नड्डा २०२५ पासून नितीन नबीन धन्य आहे कार्यकर्ता, त्याची शौर्य गाथा!

कमळाच्या चिन्हात आहे एक विश्वास,भारताची शान वाढवण्याचा प्रगल्भ विचार!त्याच्या हृदयात, त्याच्या रक्तात, देशभक्तीचं समर्पण आहे सदैव! चिखलातून उगवलेले कमळ पानाला चिखल लागू देत नाही तसे भाजपा कार्यकर्ता अंगाला डाग लागू देता व्रतस्थ जीवन जगतो. हेच ४६ वर्षातील समर्पित कार्यकर्त्याच्या जीवावर दोन खासदावरून तीनशे तीन खासदार, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्रिमंडळ, अनेक राज्यात मुख्यमंत्री, मंत्री, हजारो आमदार झाले आहेत. अटलजी अडवाणींची भाजपा मोदी शाह यांनी जगात एक नंबर ची पार्टी केली ती समर्पित कार्यकर्त्याच्या जीवावर च

शब्दांकन....

**श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील**

जिल्हा संयोजक , भाजपा सोशल मीडिया सेल, उत्तर नगर जिल्हा